|| श्री स्वामी समर्थाय नम: ||

# || श्री महालक्ष्मी नवशती ||


वैद्य गणेश लक्ष्मणराव शिंदे
(B.A.M.S.)

मनकर्णिका पब्लिकेशन

मनकर्णिका प्रकाशन पुष्प – **५६**

- **।। श्री महालक्ष्मी नवशती।।**
- **© वैद्य गणेश लक्ष्मणराव शिंदे**
  (B.A.M.S.)
- **प्रथम आवृत्ती - १३ एप्रिल २०२१ (गुढीपाडवा)**
- लेखन सहाय्य
  **सौ. प्रियंवदा अरविंद जोशी**
- अक्षरजुळणी
  **सौ. अर्चना गजानन एकतारे**
  **श्री. गजानन अमृत एकतारे**
- पेजसेटींग व मुखपृष्ठ
  **नयना मते**
- प्रकाशक
  **गिरीश दगडूलाल गांधी**
  **'मनकर्णिका पब्लिकेशन'**
  विशाल अपार्ट., पडवळ आळी,
  चिंचवडगाव, पुणे – ४११ ०३३.
  मो.: ९०११००१६३५
  E-mail: manakarnikapc@gmail.com
- मुद्रक
  **'भाग्यश्री ऑफसेट प्रिंटर्स',**
  संगमवाडी, पुणे – ४११ ००३.
- मूल्य – **₹ ७५/–** (पंच्याहत्तर रुपये मात्र)

।। श्री स्वामी समर्थाय नमः ।।




।। श्री महालक्ष्मी नमः ।।



।। ॐ द्रां श्री स्वामी समर्थाय नमः ॐ ।।
।। ॐ द्रां श्री स्वामी समर्थाय नमः ॐ ।।
।। ॐ द्रां श्री स्वामी समर्थाय नमः ॐ ।।

# ।। श्री मातृ-पितृ कृपातीर्थ तारक मंत्र ।।

नि:शंक हो। निर्भय हो। मना रे।
प्रचंड मातृपितृबळ पाठीशी रे।
अतर्क्य अवधूत हे स्मरणगामी।
अशक्यही शक्य करतील स्वामी।
जिथे मातृपितृ पाय तिथे न्यून काय।
स्वये भक्त प्रारब्ध घडवी ही माय।
आज्ञेविण काळ ना नेई त्याला।
परलोकीही ना भीती तयाला।
उगाची भीतोसी भय हे पळू दे।
जवळी उभी अमृतशक्ती कळू दे।



जगीं जन्ममृत्यू असे खेळ ज्यांचा।
नको घाबरू तू असे बाळ त्यांचा।
खरा होई जागा श्रद्धेसहित।
कसा होशी त्यावीण तू मातृपितृभक्त।
कितीदा दिला बोल त्यांनीच हात।
नको डगमगू मायबाप देतील साथ।
विभूती नमन नाम ध्यानादि तीर्थ।
मातृपितृ अमृत देवच या पंचप्राणामृतात।
हे तीर्थ घे। आठवी रे। प्रचीती।
न सोडी कदा स्वामी ज्या घेई हाती।

मातृपितृ हेचि खरेच सार्थक देव। नाही जगात दुसरी काही अमृत ठेव।
या बालकाकडून जरी झाली काही चूक। घेतील सांभाळूनी ही मौल्यवान रत्ने मारूनी हाक।
पूर्णविराम द्यावा येथील नाटकी मायाजाळास। घेऊनी कुशी उजळावी या बालकाचे जीवनास।
।। श्री मातृपितृऽर्पणमस्तु ।।

।। श्री अक्कलकोट स्वामी समर्थ चरणारविंदाऽर्पणमस्तु ।।
।।अनंतकोटी ब्रह्मांडनायक राजाधिराज योगीराज श्री सद्गुरु अक्कलकोट स्वामी समर्थ महाराज की जय ।।

# • अनुक्रमणिका •


| अध्याय | अध्यायाचे नाव | पृष्ठ |
|---|---|---|
| पहिला | आदीलक्ष्मी अध्याय | |
| दुसरा | धैर्यलक्ष्मी अध्याय | |
| तिसरा | धान्यलक्ष्मी अध्याय | |
| चवथा | विजयालक्ष्मी अध्याय | |
| पाचवा | विद्यालक्ष्मी अध्याय | |
| सहावा | संततीलक्ष्मी अध्याय | |
| सातवा | धनलक्ष्मी अध्याय | |
| आठवा | गजलक्ष्मी अध्याय | |

पहिला अध्याय

# ।। आदीलक्ष्मी अध्याय ।।

**श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।**
**श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री महालक्ष्मी नमः। श्री ग्रामदेवताय नमः।**

गजानना गणेशा महाकाया। विशालबुध्दी तुझिया ठाया। करशी सफल भक्तकार्या। प्रथम मी नमितो तुज।।१।। प्रल्हाद रक्षण्या प्रगटला स्तंभातून। हिरण्यकश्यपूचा वध करून। केलेती संतुष्ट भक्ता आपण। नृसिंहा तुम्हा माझे नमन।।२।। जिच्च्या नामे पावन कोल्हापुर। वधिला जियेने कोल्हासूर। रक्षिलेस माते सर्व मुनिवर। महालक्ष्मी नमन तव चरणी।।३।। ब्रह्मा, विष्णु आणि महेश्वर। निर्मिती, पालन, अन् संहार। करिती निरंतर आपुले कार्य। तयांच्या चरणी विनम्र मी।।४।। वेदांतकर्ते जे सकल मुनी। मिमांसा कर्ते थोर जैमिनी। योगशास्त्र प्रवर्तक पतंजली। तयांसी मी नमितसे।।५।। गुरुकाव्य, पालकाप्य, वाल्मिकी। त्यास पराशरदिक मुनी। थोर राजे मनु प्रभृती। नमन माझे तयांचे चरणी।।६।। न्यायशास्त्रकर्ते गौतममुनी। अलंकारशास्त्र कर्ते भरतमुनी। धर्मशास्त्रकर्ते सकलमुनी। सर्वांचे चरणी विनम्र वंदन।।७।। ज्ञानेश्वरादि श्रेष्ठ कवी। मुक्यांसही जी बोलते करवी। ती वाग्देवता सरस्वतीदेवी। नमितसे मी सकलांसी।।८।। जिथे चंचल इंदिरा स्थिर। नाशितसे जे पापांचा निकर। दक्षिणकाशी नाम करवीर। भवरोग नाशक क्षेत्र पवित्र।।९।। नाना देव विद्याधर युक्त। नाना द्रुम अन् तीर्थ वेष्टित।

विष्णुचक्रे जे चिन्हांकीत। ऐसे पवित्र नैमिषारण्य।।१०।। काश्यप, गालव, गौतम, वसिष्ठ। मांडव्य, दुर्वास, कपिल, मुद्गल। जमदग्नि, विभावसु, वामदेव। अत्रि, मार्कण्डेय, जातुकर्ण्य।।११।। ऐसे अठ्ठ्याऐंशी सहस्रमुनी। पुसती ते सुता लागुनी। त्रिभुवनातील तीर्थमहात्म्य ऐकोनी। संशय मनी दाटतसे।।१२।। जे देई सर्व तीर्थांचे फळ। ऐसे एकची क्षेत्र निर्मळ। सांग करोनी मन निश्चळ। ऐकोनी सूत बोलतसे।।१३।। जे लवाधिक काशीक्षेत्राहून। पवित्रक्षेत्र करविराभिधान। राही विष्णु देवीरूप धर। होवोनी भक्तांसी वरदायक।।१४।। राहे करवीरक्षेत्रे महालक्ष्मी। जी सर्वची वांछा पुरवी। देई जनांसी भुक्तीमुक्ती। कोल्हापुर नामे ख्यात असे।।१५।। प्रत्यक्ष हवी रक्षी जयासी। ब्रह्मादिदेवांची जेथे वस्ती। रंकभैरव उभा साधुरक्षणी। ऐसे पवित्र पापनाशक क्षेत्र।।१६।। करवीर सर्व तीर्थवरांनी युक्त। जे देव श्रेष्ठ मुनी सेवित। स्नानमात्रे जेथे पापनाश। ऐसे श्रेष्ठ करवीर क्षेत्र।।१७।। ऐसेची कोणे एके दिवशी। विचार करती मार्कण्डेय ऋषी। नाही आराधिले मी ईशानासी। केला व्यर्थ मी मनुष्यजन्म।।१८।। विचार करती ते मानसी। आचरावे मी तपासी। परि अल्प तपही अमूप होई। असे ऐसे स्थान कोणते।।१९।। ऐसे चिंतीत असता ऋषी। मुनी नारद आले आश्रमासी। पाहून मार्कण्डेय हर्षित मानसी। पुसती नारदांसी तेधवा।।२०।। जेथे सर्व दैवते तीर्थे। हेमिले, जपिले द्विगुणीत होते। ऐसे पवित्र स्थान कोणते। सांगावेजी आपण मजसी।।२१।। नारद सांगती मार्कण्डेयांस। असे ऐसे लक्ष्मीचे आद्यपीठ। असती तेथे नाना पवित्र तीर्थ। ऐसे महान करवीर क्षेत्र असे।।२२।। हे असे प्रथम श्री विष्णुस्थान। झाले नंतर लक्ष्मीचे आगमन।

भुक्ती-मुक्तीही देते म्हणून। काशीहून यवाधिक श्रेष्ठ असे।।२३।। विष्णु देवे निर्मिली दोन्ही। करती विवाद शिव अन् लक्ष्मी। आपुलेच क्षेत्र अधिक म्हणती। श्रीविष्णु करती निर्णय त्याचा।।२४।। तोलिले दोन्ही तुला घेऊन। हराचे पारडे गेले वर। असती नाना तीर्थे, देव म्हणून। माझेच पारडे जड म्हणे लक्ष्मी।।२५।। झाला निर्णय तेथेच प्रत्यक्ष। करवीर क्षेत्र श्रेष्ठ यवाधिक। पाहून शिव झाला खिन्न। करवीर क्षेत्री राहिला येऊन।।२६।। आले करविरी विश्वनाथ। बिंदुमाधवही आले तेथ। प्रयागासह अन्य सकलतीर्थ। येवोनी करविरी राहती।।२७।। तेहतीस कोटी सकलदेव। करती येथे येऊन निवास। धर्माधर्म मोक्षद्वारे अपार। गोमती मिळाली जीवंती नदीस।।२८।। येथे करता सत्पात्री दान। होतसे ते मेरु समान। केला येथे अल्पही जप। होतसे तो अनंतगुण।।२९।। करविरी जर मज भिक्षा देईल। देईन तयास पुण्य अपार। करुनी ऐसा निश्चय। श्रीदत्त फिरती नित्य भिक्षेस।।३०।। येथे अन्नदान, अन्यदान करती। ते अनंत फळे पावती। हे जाणूनी कपील मुनिपती। या क्षेत्री करती निवास।।३१।। येथे असती जळरूपे शंकर। पाषाणरूपे क्षिराब्धिजावर। वालुकारूपे राहती मुनिवर। वृक्षरूपे देव निवास करती।।३२।। करवीर क्षेत्री गया शिरावरी। जो स्वपितरांचे श्राध्द करी। तो स्वशत कुलें उध्दारी। तो स्वतः आपण मुक्त होई।।३३।। या कारणी तू येथे राहुन। निश्चल तप करी महान। तेणें या लोकी ही जाण। इच्छित कामना पूर्ण होईल।।३४।। नारद सांगती मार्कण्डेयांसी। अगस्ती मुनींनी सोडीली काशी। खेद झाला बहु अगस्तीसी। म्हणती रहावे करवीर क्षेत्री।।३५।। येती स्त्रीसह अगस्ती करवीरी। लक्ष्मी तया तेथे राहू ने दी। ऐसे दोनही काशीत राहण्यासी। येतसे विघ्न अगस्ती ऋषीशी।।३६।। मार्कण्डेय पुसती नारदासी। अगस्तींनी का

सोडीली काशी। करवीरी का न राहू देई लक्ष्मी। अगस्ती ऋषींशी कोणत्या कारणे।।३७।। नारद वदती मार्कण्डेयांसी। एके काळी अगस्ती ऋषी। दाखविण्या तीर्थक्षेत्रे शिष्यांसी। फिरत होते ते सर्वत्र।।३८।। फिरता आले ते कुलपर्वतासी। तेथील मनोहर सरोवरापाशी। बैसला होता सुद्युम्न हरिध्यानासी। त्याने न पाहिले अगस्तीसी।।३९।। झाले अपमानीत अगस्ती ऋषी। अभागी हा न पूजितसे मजसी। नाही योग्य हा हरिसेवनासी। म्हणूनी सुद्युम्नास त्यांनी शापिले।।४०।। म्हणती फिरो हा गज होवोनी। ऐसा घोर शाप दिला त्यांनी। सुद्युम्नाने प्रार्थिले विष्णुसी। म्हणे कसे घडेल मज हरिध्यान।।४१।। गजयोनी असे अज्ञान म्हणून। न घडेल मज तुझे ध्यान। गजजन्मातही असावे तव स्मरण। ऐसे द्यावे मज वरदान।।४२।। करी ऐसा एकची आकांत। प्रद्युम्न कळवळूनी निश्चित। ऐकून तयाचा थोर आकांत। प्रगटले तेथे स्वयं हरि।।४३।। कर्मशेष हा भोगोनी गजयोनी। अंती येशील माझ्या स्थानी। ऐसे दुःख दिधले अगस्तींनी। तयांसी दुःख भोगावे लागेल।।४४।। ऐसे वचन सुद्युम्नास देऊन। आले परत वैकुंठी नारायण। तेंव्हाच फिरता फिरता गमन। माझे ही वैकुंठी जाहले।।४५।। मजसी वदले मग नारायण। माझ्या भक्ता शापीले म्हणून। अगस्तीस काशीद्वयी निवास। घडू नये ऐसे करी।।४६।। उत्तरदिशी असे काशीपट्टण। दक्षिणेस असे करवीर स्थान। हे दोन्हीही केले असे निर्माण। मीच पूर्वी नारदा।।४७।। काशीत विश्वेशरूपे करून। मीच करी मुक्ती प्रदान। दक्षिणेस विष्णुरूपी राहून। भुक्तीमुक्ती मी देतसे।।४८।। अगस्ती निवसती उत्तरेस काशीत। न सोडित तो ते पुण्यक्षेत्र। युक्ती प्रयुक्तीने अगस्तीस। काढावे बाहेर काशीतून।।४९।। अंगिकारुनी विष्णुवचन। निघाला नारद तेथोन। परि अगस्तीस कारणावाचून। काशी बाहेर कैसे

काढावे।।५०।। विंध्यापाशी आले नारद। विंध्याने नत करोनी शिर। केला नारदास साष्टांग नमस्कार। झाले नारदमुनी आनंदित।।५१।। मग विंध्याने पुसिले नारदास। धरणी धरण्याचे थोर सामर्थ्य। आहे मेरुपाशीच साच। मानिती सर्व देवऋषी।।५२।। ते सामर्थ्य असे मजपाशी। मेरुचे महत्त्व न वाटे मजसी। किष्किंध क्रौंच सह्याद्रि। नसती पृथ्वी धरण्या समर्थ जे।।५३।। मेरु त्रिकुट श्रीशैलादिक। मानले जाती गिरीनायक। परि ते नाममात्र पृथ्वीधारक। तयांची निंदा मी न करी।।५४।। विंध्यासी म्हणती नारद। बोललास तू सत्यवचन। परि तुझा थोर अपमान। फक्त मेरुपर्वतच करितसे।।५५।। मजसी तुम्ही दोघे समान। उगा एकाचे अधिक न बोलेन। 'तुझे कल्याण असो' ऐसे वदून। नारद तेथोनी निघाले।।५६।। ऐकोनी नारदाचे वचन। विंध्यास वाटला थोर अपमान। मेरुस मान देती ग्रहगण। सूर्य नक्षत्रेही घालती सव्य।।५७।। यास्तव मनी गर्व करून। मेरु करी माझा अपमान। ऐसा विचार मनी करून। विंध्य पर्वत उंच वाढला।।५८।। नित्य नेमे उगवी भास्कर। करी सर्व लोकांसी उपकार। म्हणोनी भानु तेजस्वी फार। पावला श्रेष्ठत्व जगात।।।५९।। सूर्य निघाला दक्षिण दिशी। परि स्तंभित झाली रथगती। अरुण बोले मग सूर्यासी। विंध्य करी स्पर्धा मेरुशी।।६०।। विंध्ये केले गगन मार्गाचे रोधन। पूर्व उत्तरेकडील सारे विश्व। सूर्यकिरणांनी तापले पुष्कळ। दक्षिण-पश्चिमेस तम दाटला।।६१।। ऐसे त्रैलोक्य झाले व्याकूळ। होवोनी चिंतीत साधु-ऋषीगण। गेले सारे ब्रह्मदेवास शरण। करती स्तवन ब्रह्माचे।।६२।। केले त्यांनी ब्रह्मदेवाचे स्तवन। ऐकून ब्रह्मदेव झाले प्रसन्न। करिता हे अभीष्टप्रद स्तवन। मी, विष्णु, अन् शिव होऊ प्रसन्न।।६३।। देऊ तयासी आयुष्य आरोग्य। निर्भयत्व, पुत्र, धन, सौभाग्य। परलोकाही देऊ भोग योग्य। प्रदान करू

मोक्ष तयासी।।६४।। मग म्हणाले तयांसी ब्रह्मदेव। केले विंध्याने सूर्याचे पथरोधन। सांगितो याचा उपाय तुम्हास। ऐकावे आपण सर्वांनी।।६५।। काशीक्षेत्रात मुनी अगस्ती। शिवध्यान करीत करी वस्ती। करावी तयासी तुम्ही विनंती। कार्य तुमचे होईल सफल।।६६।। अगस्तीचे सामर्थ्य महान। वातापी इल्वल नामे राक्षस। वातापी आलेल्या अतिथीस। देतसे इल्वलाचे मांस।।६७।। अतिथी तो जाता बाहेरी। इल्वलास वातापी पुकारी। इल्वल अतिथी उदर फाडोनी। येतसे बाहेर सत्वरी।।६८।। ऐसे ते जनांस पीडिती। गेले भोजनास तेथे अगस्ती। येता बाहेरी वातापी पुकारी। अगस्तीने इल्वलास उदरी जिरविले।।६९।। मग भयभीत झाला वातापी। जळरूपे मिळाला तो समुद्री। समुद्रास मग प्राशुनी अगस्ती। वातापीस ठार मारिती।।७०।। ऐसे सामर्थ्यवान अगस्ती। जावे आपण तयांचे चरणी। ऐकोनी मुनी विचार करती। जावे या निमित्ते काशीस।।७१।। तेणे साधतील कार्ये तीन। एक अगस्तीस प्रार्थना। दुजे काशीक्षेत्री गमन। तिसरे होईल विश्वेश्वर दर्शन।।७२।। ऐसा मानसी विचार करोन। आले काशीस देवऋषीगण। तेथे करून मणिकर्णिका स्नान। संध्यादि विधी केले त्यांनी।।७३।। मग दर्भतीलोदके पितृ तर्पून। विश्वेश्वर भवानीस पूजिले जाऊन। मुखे काशीमहिमा वर्णित। आले सर्व अगस्तीकडे।।७४।। आले बहुशिष्य युक्त आश्रमास। जेथे पतिव्रता लोपमुद्रेचे चरणपद्म। उमटले ऐसा पावनाश्रम। बहु तेजस्वी अगस्तीऋषींचा।।७५।। सर्व देवाधिऋषीगणांस पाहोन। यथायोग्य तयांसी बैसवोन। आशीर्वाद मुक्त हस्ते देऊन। अगस्ती येण्याचे कारण पुसती।।७६।। बृहस्पती वदती अगस्तींसी। मुने, तू धन्य पुण्यकीर्ती असशी। पतिव्रता लोपामुद्रा तव कामिनी। तपोनिधी असे तुजसवे छायेसम।।७७।। मुने, तू तपोनिधी परोपकारी। यास्तव आलो तुझे

द्वारी। करी आमुचे कार्य सत्वरी। हीच असे आमुची विज्ञापना।।७८।। असा आपण त्रिकाल ज्ञानी। मेरुशी स्पर्धा करी विंध्याद्रि। वाढला तेणे स्तंभित तमारि। विंध्याने त्याचा मार्ग रोधीला।।७९।। ऐकोनी बृहस्पतीचे वचन। क्षणभर मग करून ध्यान। तुमचे कार्य मी नक्की करीन। आश्वासून निरोप देती अगस्ती।।८०।। वदती लोपामुद्रेस अगस्ती। कार्य साधण्या हे सक्षम असती। परि मजसी केली विनंती। त्याचे कारण तूज सांगतो।।८१।। जी पुण्याची साक्षात राशी। कोणसोडील ऐशी काशी। प्राप्त झाले विघ्न आपणासी। झाला विमुख विश्वेश्वर।।८२।। म्हणे पूर्ण मुद्राच्या आत्मजा। रक्षिसी काशीस्थित मनुजा। ऐसे असता हे काशीरक्षका। मजसी का बरे घालविसी।।८३।। कार्यास्तव देवांनी प्रार्थिले मला। यास्तव त्यजणे प्राप्त काशीला। परोपकारास्तव कार्य करण्या मला। भलतेच हे करावे लागते।।८४।। अश्रूपूर्ण नेत्रे तो मुनिराणा। करी काशी स्थानासी प्रदक्षिणा। देई दोष तो स्व-प्रारब्धाला। जड अंतःकरणे निघे काशीतून।।८५।। निघाले लोपामुद्रेसह मुनी। चालले उपोषणे खेदयुक्त मनी। पाहून तयांचे शोकाते धरणी। घेई आक्रसून आपुली काया।।८६।। आले विंध्यासमीप मुनी। विध्यं उंच वाढोनी गगनी। पाहिले विंध्याने संतप्त मुनी। धरिली विंध्याने लहान काया।।८७।। आला विंध्य मुनींस सामोरी। हात जोडोनी नमस्कार करी। म्हणे असे आपुला किंकर मी। करावी आपण आज्ञा मजसी।।८८।। तव विंध्याचलास मुनी वदती। जात असे मी दक्षिण दिशी। येईन नंतर मी पुनःपरती। रूप तव असू दे असेच सान।।८९।। विंध्य सान झाला पाहून। अरुण सूर्यरथाचे करी प्रेरण। तेणे सुरू झाले सूर्याचे गमन। जग त्यामुळे झाले स्वस्थ।।९०।। मनी होते अगस्ती दुःखित। म्हणती नसे पवित्र काशीसमान। नसे तपासी योग्य स्थान।

आता मी कोठे रहावे।।९१।। तेव्हा कृपाळु ईशान। मुनीच्या मानसी जाऊन। करवी करवीर क्षेत्राचे स्मरण। तेणे अगस्ती झाले हर्षित।।९२।। लोपामुद्रा झाली चकित। म्हणे काय झाले अवचित। होता आपण दुःखचित्त। आता हर्षित कैसे झाला।।९३।। मुनी तिज सांगती कारणाते। विश्वेशाच्या कृपा प्रसादे। मज करवीर क्षेत्र आठवले। म्हणती तयास दक्षिण काशी।।९४।। असे हे सर्व देव तीर्थयुक्त। म्हणती ते काशीहून यवाधिक। राहूया आता करवीर क्षेत्रात। म्हणूनी हर्षित झालो मी।।९५।। असे हे स्थान भुक्तीमुक्तीप्रद। वर्णू न शकती महिमा सुरगण। ऐसे हे स्थान पवित्र पावन। माहात्म्य त्याचे कैसे सांगू।।९६।। करवीर असे काशीहून यवाधिक। म्हणूनी शिवही राहती येथ। आला मणिकर्णिकादिक तीर्थांसह। अन्य ही तीर्थे आली येथे।।९७।। त्रिकाळ श्रींचे आर्तिक्य दर्शन। सर्वांस भक्तिपूर्वक भिक्षादान। करवीर स्थानी ही कर्मे दोन। पापनाशक पुण्यकारक असती।।९८।। येथे चार वेदमूर्ती धरोन। नानाविध मंत्र गायन करुन। करती मंत्र पुष्पांजली दान। तयांस वेदपारायण पुण्य मिळे।।९९।। करवीरास म्हणती कोल्हापूर। असे महालक्ष्मीचे क्षेत्र सुंदर। ऐकता, वाचता हे माहात्म्य। भुक्ती मुक्ती त्यास प्राप्त होती।।१००।।

**श्री महालक्ष्मी चरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।**

दुसरा अध्याय

# ।। धैर्यलक्ष्मी अध्याय ।।

**श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।**
**श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री महालक्ष्मी नमः। श्री ग्रामदेवताय नमः।**

वक्रतुण्ड वरद विनायक। तुझिया पुढे मी नतमस्तक। महालक्ष्मी महिमा वर्णन्यास। द्यावी बुध्दी गजानना।।१।। समर्थ माझे सद्‌गुरु स्वामी। करितो तयांसी वंदन मी। तयांच्या कृपे घेतली लेखणी। करीन करवीर लक्ष्मी स्तवन।।२।। अंबे भवानी महालक्ष्मी माते। द्यावी सद्‌बुध्दी तव बालकाते। नवशतीत माहात्म्य वर्णिण्याचे। द्यावे तू मजसी सामर्थ्य।।३।। नारदमुनी पुढे सांगती। क्षेत्र महिमा ऐकून मुनिसती। जाहली बहु प्रसन्न चित्ती। पूसे ती पराशरमुनींची संगती।।४।। कोणते कारणे पराशर मुनी। आले ह्या करवीर स्थानी। कोणते आचार आचरले त्यांनी। वदावे मजसी सविस्तृत।।५।। ऐकोनी सतीचा प्रश्न उत्तम। जाहले अगस्ती मुनी प्रसन्न। करिता करवीर माहात्म्य कथन। न बाधती गे मार्गश्रम।।६।। विष्णूने तोलीले काशी, करवीर। यावाधिक ठरले करवीरपूर। ऐकोनी ही मात पराशर। करितसे विचार आपुले मनी।।७।। आले बुध्दीनाशक कलियुग। मानव अल्पायुषी मतिमंद। कैसा जाणेल तो वेदशास्त्र। करावे कैसे हितार्थ रक्षण।।८।। नाना इतिहास, पुराणे, स्मृती। करण्यासी समर्थ कोणाची मती। समर्थ एकलाची कमलापती। जाईन तयासीच शरण।।९।। ऐसा मनी विचार करुनी। स्वस्त्रीसह निघाला

नैमिष्यारण्यातूनी। पातला लगबगे करवीर पट्टणी। जाहला संतुष्ट आपुले मनी।।१०।। करवीराच्या उत्तरेस कृष्णा वारणा। पूर्वेस शोभती गणिकी, कृष्णा। दक्षिणदिशा भूषविती वेदा, यक्षा। शिवा, मयुरी, पश्चिम दिशी।।११।। महाद्वारी रामेश्वर चक्रेश्वर। शंकर, श्रीगुप्त मल्लिकार्जुन, हर। मध्यभागी तिचे करती निवास। पूर्वेस उज्ज्वलांबा दक्षिणेस कात्यायनी।।१२।। पश्चिम दिग् भूषवी सिद्धबटुकेश्वर। उत्तरेस केदार वसतसे। अष्टदिशी अष्टलिंगे थोर। करवीर स्थानी विराजती।।१३।। करवीराच्या चारही दिशांसी। असती चार जलाशायी। रक्षिण्या घेऊन सुदर्शन करी। शेषावर श्रीविष्णु पहुडले असती।।१४।। म्हणे पराशर पूर्वजन्म सुकृते। ऐसे अतिपवित्रस्थान पाहिले। भुक्तीमुक्तीही जे देतसे। धन्य माझा जन्म जाहला।।१५।। सपत्नी पराशर गेले प्रयागाते। करी स्नानदानादि विधी हर्षे। तेथोनी करवीराप्रती आले। मलापकर्ष स्नानानंतर भवानी विश्वेश्वरास नमिती।।१६।। नमी विनायक, कामाक्षी, वाराही। विधी, विष्णु, शिव, मुक्तेश। मणिकर्णिकेत स्नान करोनी। मणिकर्णिकेश, कुक्कुटेशादिंसी नमी।।१७।। नंतर येवोनी गर्भागारी। महालक्ष्मीते नमन करी। भावे गंधादि षोडशोपचारी। पूजी पराशर महालक्ष्मीसी।।१८।। भक्तिभावे पराशर मुनींनी। स्तविली श्रीदेवी भवानी। दर्शने झालो कृतकृत्य मनी। रक्षावे संकट भयापासोनी।।१९।। स्तवने झाली संतुष्ट ईश्वरी। म्हणे सत्यनिष्ठ, जितेंद्रिय भक्त म्हणोनी। राहा येथे तू स्वस्थ मनानी। पूर्ण होवोत सकल मनोरथ।।२०।। श्रीलक्ष्मीचे वरदान पावोन। मुक्तीमंडपी धर्मकथा श्रवण। श्रींचे निरांजन पाहोन। पश्चिमेस पर्णशाळेत करी वास।।२१।। सप्तदिन तेथे वास करोन। काशीविधी समस्त संपादून। जाती सपत्नी गयाक्षेत्रा लागोन। तेथे पिंडदानादि संपादिती।।२२।।

रुद्रपदाच्या चारी दिशेस। रुद्रगया अडीच अडीच कोस। त्यांत एक कोस गया शिर। क्षेत्र ते तीर्थांचा निकर असे।।२३।। गयाश्राद्धाचे महत्त्व फार। श्राद्ध करिता तृप्त पितर। पितृऋण मुक्त होतसे नर। तयाची शतकुळे उद्धरती।।२४।। करोनी स्नान फल्गुत। देवादिकांसी करुनी तृप्त। श्राद्ध करोनी तोषवावे पितर। मग प्रेतपर्वता जावे।।२५।। तेथे तीळमिश्रित सातू अर्पून। करावे प्रेतरुपी पितर तृप्त। मग नहावे फल्गु तीर्थात। असे ते तीर्थामाजी श्रेष्ठ।।२६।। गंगा गदाधराचे चरण नीर। फल्गु साक्षात गदाधर। जलरुपे वाहे या भूमीवर। म्हणोनी गंगाधिक फल्गु।।२७।। पूर्वदिनी फल्गुत स्नान करून। दुसरे दिनी धर्मधर्मेश नमून। तिसरे दिनी ब्रह्मसरी स्नान करून। ब्रह्मसरः श्राद्ध करावे।।२८।। द्यावे आम्रवृक्षास नीर। तेणे मुक्त होती पितर। यमा प्रीत्यर्थ बली देवून। श्वानबळी, काकबळी द्यावा।।२९।। चवथे दिनी फल्गुत न्हाऊन। जे गयाशिरी रुद्रादि चरण। तेथे करावे पिंडदान। तेणे तृप्त होती पितरगण।।३०।। नंतर चांडालादि तोषवावे। अक्षय्य वटतीर्थी नहावे। विप्र पूजून जेववून श्राद्ध करावे। नमावे वटेश्वरासी।।३१।। एकार्णवी वटाच्या पत्री। जो निजे बाळरुपधारी। नमावा योगशायी श्रीहरि। भववृक्षनाशक अक्षय्य वटास नमावे।।३२।। पराशर प्रयाग करवीर गया करोनी। महालक्ष्मीस भावे नमोनी। ब्रह्मनाम गिरीस जाई। तप केले येथे ब्रह्माने।।३३।। पावला तो सिद्धी झडकरी। तेणे तो प्रजा उत्पन्न करी। तेथे सोमेश्वरासी स्थापन करी। सोमेश्वर सरोवर करी उत्पन्न।।३४।। ब्रह्माने दिधला वर तयासी। करिता तप निःपाप परमपदासी। सकाम पावती कामासी। निष्कामासी लाभेल मोक्षपद।।३५।। आला पराशर या स्थानासी। करी सोमतीर्थी स्नानासी। यथाविधी तर्पोन पितरांसी। देवालयी दर्शना गेला।।३६।। यावे नमितसे तो

सोमेश्वरा। पाहुनी रुद्र, शतरुद्र, श्रीरुद्रा। पुरुषसुक्त कुचरुद्र मंत्रा। पवमान म्हणोनी करी अभिषेक।।३७।। गंध, अक्षता, पुष्प अर्पोनी। धूपदीप नैवेद्य करोनी। सदाशिवास निरांजना ते करोनी। साष्टांग नमन करितसे।।३८।। मग तो पाहोनी सर्व गिरी। शुद्धस्थानी तो आश्रम करी। पत्नीशिष्यांसह तेथे राहोनी। प्राण रोधून तप करितसे।।३९।। प्रखर तप करितसे तो मुनी। तव त्याच्या शिरापासोन अग्नी। मोठा थोर उत्पन्न होवोनी। सर्व लोक जाळू लागे।।४०।। त्याचे ऐसे तप पाहोनी। उपजे चिंता शक्राचे मनी। मग त्याने मदना बोलावूनी। तयासी शक्र सांगतसे।।४१।। मुनी करितसे तप प्रखर। तेणे झाले मम स्थान अस्थिर। करावे तयाचे तपनाशन। विनंती मान्य करी बापा।।४२।। मदन वसंत अप्सरा घेऊन। आला ब्रह्मगिरी लागोन। वसंते धुंद केला परिसर। जेथे पराशर तप करितसे।।४३।। पाही पराशराचे उग्रतप। त्याच्या आश्रमी प्राणी हिंस्र। सोडोनी आपुले जाति वैर। प्रेमे एकसरे करिती क्रिडा।।४४।। ही तर सत्संगाची महती। दुष्टही होती सन्मती। पराशर संगे पशु पंक्ती। जाहली सकल सुशील।।४५।। करवीर निवासाची महती। लाभे मशकादिंसीही मोक्षगती। यास्तव स्वर्गीचे देव इच्छिती। करवीर क्षेत्र निवास।।४६।। पराशर करितसे उग्र तपाचरण। तयाचे तप नाशण्याकारण। वसंते केले प्रफुल्ल वन। रंभादि अप्सरा करिती नर्तन।।४७।। मदनही भये दूर राहून। सोडी हळूच आपुला बाण। करवीर क्षेत्र प्रभावा कारण। न ढळे पराशरांचे मन।।४८।। काम सोडीतसे दुजा बाण। झाला तोही निष्फळ पाहून। सोडी मग ऐसा बाण। जेणे प्रत्यक्ष ईशान ढळविला।।४९।। तेणे भिन्न हृदय पराशर। नेत्र उघडोनी पाही परिसर। पाहे आपुलाच आश्रम परिसर। रंभेस सोडोनी गेला मदन।।५०।। तिचेही मनी एक निश्चय। मुनीस या मी

भोगीन। अथवा याचा शाप घेऊन। करीन तयाचे तपनाशन।।५१।। म्हणे सत्यवतीस पराशर। इंद्रे धाडीले यांना येथवर। हिचे सवे मदनादि सर्व। आली येथे मम तपनाशार्थ।।५२।। जर मी अप्सरेस शापीन। होईल माझे तपनाशन। प्रिये, करावे तूच शासन। जेणे ही पुन्हा ऐसे न वर्तेल।।५३।। पतिवचन ऐकोनी सत्यवती। शाप देण्यास सिध्द झाली। भये पळू लागले मदनादि। मुनी तयांसी पाचारितसे।।५४।। तुम्ही असा आमुचे अतिथी। तेणे माझी पूजा घेवोनी। जावे तुम्ही तुमचे स्थानी। हेच असे शास्त्रसंमत।।५५।। तेव्हा मदन वदे पराशराला। इंद्रादि लोकेच्छा नसे तुजला। घेशील कोणतेही लोकाला। अशक्य तुज नसे काही।।५६।। तुझी पत्नी ही सत्यवती। तुझे सावली सम वर्ते ती। सर्व सतीत सर्व श्रेष्ठ सती। दर्शने होई गंगास्नान प्राप्ती।।५७।। करवीर क्षेत्री तू राहसी। करीसी येथे तू तपासी। क्षेत्र हे यावाधिक काशी। धन्य धन्य तू पराशरा।।५८।। पुढे मदन वदे पराशरास। आम्ही तर इंद्राचे अनुचर। द्यावी आपण आज्ञा आम्हास। शक्रास काय द्यावा निरोप।।५९।। पराशर म्हणे सांगा इंद्रास। न इच्छी मी त्याचे पदास। असावे तुवा स्वस्थ होऊन। भोगप्रिया तू भोग भोगी।।६०।। जे करवीर क्षेत्री राहती। नसे अशक्य काहीही त्यांसी। तुझे पद ते नश्वर निश्चित। कोण येथे इच्छील ते।।६१।। नित्य जगन्मातेचे मुखावलोकन। पाहती देवी निरांजन। जेण होई क्रोधादिंचे बीजनाशन। भीती तयांसी कोणती।।६२।। तुम्ही सर्व देव असा मूर्ख। करती प्रयत्न मुनी तपनाशार्थ। विसरलास का दुर्वास शापास। न करावे ऐसे वर्तन।।६३।। ऐकोनी मदनादि निघाले। मदन म्हणे बाण व्यर्थ झाले। कैसे शक्रा समोरी जावे। चिंतामनी लागली।।६४।। मदनाचे वृत्त ऐकोनी। वदे शक्र तया लागोनी। पवित्र धन्य करवीर म्हणोनी। स्वर्गस्थ देव इच्छिती तेथे वास।।६५।। स्वर्गस्थ आम्ही न

जिंकीला कोप। झाला तो ब्रह्महत्त्येस कारण। पाप अन्य तिर्थी न गेले म्हणोन। करवीर क्षेत्रासी केले गमन।।६६।। करवीरी केले स्नानादिक सर्व। गेले तेणे आमुचे पाप। ऐसे अतिपवित्र हे क्षेत्र। महिमा तयाचा वर्णिता न येई।।६७।। करवीरक्षेत्र करुनी निवास। पाहती निरांजनी श्रीचे मुख। स्नानादिकेही पावती मोक्ष। जन सर्वही करवीर क्षेत्री।।६८।। मोक्षादिक मिळावे म्हणोन। तयांसी ईर्षा मनी करून। आम्ही राहिलो येथे येऊन। वृक्षरुपी असे आमुचा निवास।।६९।। क्षेत्र माहात्म्य सांगोनी मदनास। जाहला मनी आनंदी शक्र। म्हणे राहिला आज मम स्वलोक। मुनीच्या तपापासोनी।।७०।। मदनादि तेथून गेल्यावरी। पराशर तपास आरंभ करी। सत्यवती ही तीर्थविधी आचरी। स्थापितसे तेथे स्व आश्रम।।७१।। मुनींच्या तपें पाताळ तापलें। सर्वही पन्नग एकत्र आले। कुंडत्रयीचे सर्व जल शोषिले। मुनी तपनाशास्तव।।७२।। पराशर मुनी धरती ध्यान। म्हणे सर्पांनी केले जल शोषण। यास्तव गारुडीक मंत्राने दर्भ। प्रेरित करुनी सोडीला सर्पांवरी।।७३।। तेणे बहुत सर्प मरण पावले। किती एक सर्प जळूनी गेले। मग सर्व पन्नग मिळुनी सारे। पराशरासी आले शरण।।७४।। केली तयांनी मुनींची स्तुती। मागिली क्षमा मुनिंप्रती। रक्षावे आम्हा त्यांसी विनविती। जाहले प्रसन्न पराशर।।७५।। पराशर म्हणती सर्पांसी। प्राशिले ज्यांनी येथील जलासी। राहावे त्यांनी याच क्षेत्री। होईल ख्यात हे पन्नगालय नामें।।७६।। तेणे संतुष्ट झाले सर्पगण। कराया सर्व जगताचे कल्याण। मुनींस संतोष व्हावा म्हणून। तेथे पाताळगंगा आणिती।।७७।। मग सर्पांसी मुनी म्हणती। हा झरा नागझरी म्हणोनी। पावेल प्रसिद्ध या जगती। होईल क्षेत्र पन्नगालय नामे ख्यात।।७८।। जे नागझरीत स्नान तर्पन करून। करतील नागेशाचे पुजन। त्यांचे गंडकुष्ठादि

रोगनाशन। होईल हे सत्य सत्यची।।७९।। नागझरीवर राहे पराशरमुनी। करी तप समाधी धरोनी। सर्पांचे विष फुत्कार ऐकोनी। सत्यवती शापी सर्पांसी।।८०।। म्हणे या आश्रमातील सर्व। होवोत मुके समस्त साप। देती दोष स्वजन्मास सर्प। पुसती मुनींस विषनाश उपाय।।८१।। ऐकोनी सर्पांचे नम्र वचन। झाले मुनी अतिशय प्रसन्न। म्हणती 'अहा हा क्षेत्र प्रभाव। दुष्टसर्पही टाकिती स्वदुष्ट भाव।।८२।। मुनी वदती त्या सर्पांस। न जाईल स्वाभाविक विष खास। परि करिता करवीर यात्रेस। विष बहुशः होईल नष्ट।।८३।। जे तीर्थयात्रा करू इच्छिती। करावे त्यांनी उपोषण निश्चिती। पूजोन गणेशा अन् पितरांसी। विप्रसाधुंचेही करावे पूजन।।८४।। दुसरे दिनी पारणे करुनी। निघावे मग यात्रे लागुनी। पितरास्तव तीर्थश्राद्ध करोनी। करावी भक्तीने तीर्थयात्रा।।८५।। अन्य क्षेत्री करती मुंडन उपोषण। करवीर असे सुवासिनींचे क्षेत्र। यास्तव अमंगल मुंडन, उपोषण। निषेध तयाचा या क्षेत्री।।८६।। असती तीर्थे दोन प्रकारची। मानस व भौम नामे तयांची। दोनही तीर्थे पावन असती। परि शुद्धमन असावे येथे।।८७।। मानसतीर्थे करिता स्नान। लाभती तया पदे परम। गुरुसेवा, सत्य क्षमा इंद्रिय दमन। न्याय, स्वधर्माचरण, अग्निसेवन।।८८।। भूतदया, हरिसेवन, सरलत्व, संतोष। तप, धृति, दान, ज्ञान, ब्रह्मचर्य। सत्यभाषणादि अठरा तीर्थे। त्याहूनही श्रेष्ठ मनःशुद्धी।।८९।। भौमतीर्थ गंगायमुनादि। वटेश्वर, कुरुक्षेत्र, श्रीशैलादि। सप्तनगरी काशी, कांची, मायादि। देती मुक्ती नाग हो।।९०।। या सर्व क्षेत्रात अधिक काशी। जी मोक्ष प्रदान करी भक्तांसी। करवीरक्षेत्र परि यवाधिक काशी। भक्तिभावे करावी यात्रा।।९१।। ऐकोनी मुनींचे वचन। प्रयागी तीर्थविधी संपादोन। अष्टतीर्थही करोनी सकल सर्पगण। आले करवीर क्षेत्रासी।।९२।।

करोनी तेथे मलापकर्ष स्नान। विश्वेशादि लिंगाचे करून पूजन। यथाविधी प्रदक्षिणा करून। मुक्तिमंडपी सर्प आले।।९३।। तेथे सोडून सर्पांचा द्वेष। श्रीवाहन होऊन राहे गरुड। भीत भीत तयासी नमोन। देवी गर्भगारी करिती प्रवेश।।९४।। नमिती सर्पगण लक्ष्मीप्रती। जी देई भक्तांस भुक्ती मुक्ती। पाहे वाट लक्ष्मीदेवी भक्तांची। होवोनी महासनाधिष्ठीत।।९५।। जी देवी धरी दिव्यांबरा। धारण करी रत्नाचिया हारा। जिंकी कोटी कोटी भास्करा। जियेची दिव्य नखकांती।।९६।। शोभन जियेचे पयोधर। मध्य जिचा कृश फार। दंत दाडिमी बीजाकार। वेणी जिंकीतसे मयुरपिच्छा।।९७।। सखीयुक्त कात्यायती गण। नित्य जियेसी करिती निरांजन। सेविती चामरें विंझणे घेऊन। चौसष्ट योगिनी जिला।।९८।। जगास जो मोहवी मदन। तयाची माता ही देवी जाण। रूप जियेचे प्रत्यक्ष जगमोहन। पाहोन सर्प झाले संतुष्ट।।९९।। सिद्धीद स्तोत्र म्हणूनी सर्प वदती। धन्य झालो तव दर्शने आम्ही। म्हणे देवी मग सर्पांसी। गरुडभय मुक्त होवोनी करावी यात्रा।।१००।।

**श्रीमहालक्ष्मी चरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।**

तिसरा अध्याय

## ।। धान्यलक्ष्मी अध्याय ।।

**श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।**
**श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री महालक्ष्मी नमः। श्री ग्रामदेवताय नमः।**

आदिशक्ती महालक्ष्मी। अद्वैत विष्णुस्वरुपिणी। राहून भूतली करवीरपुरी। देशी भुक्तीमुक्ती भक्तांसी।।१।। कशी वर्णू तुझी महती। शरण असे मी तुजप्रती। वदवुनी महिमा ही नवशती। करावी पूर्ण तूचि देवी।।२।। सर्पगण आले देवीप्रती। भक्तिभावे करती देवीस्तुती। गरुडभय मनी असे म्हणती। द्यावे माते अभय आम्हा।।३।। देवी वदे मग तयांसी। नसेल गरुडभय ध्याता मजसी। रहावे येथे निश्चित मानसी। निर्भयत्वे सर्प आले मुक्तीमंडपी।।४।। सांगितले सर्पांसी देवीने। जेथे जेथे तुमचे विष पडे। तेथे तेथे तुमचे स्थान घडे। इहपरलोकी फळप्रद।।५।। करीत असता देवीचे स्तवन। झाले एका नागाचे विषपतन। तेथेच तो श्रीगृही राहोन। देई धनलक्ष्मी भक्तांसी।।६।। पावूनी वर देवी पासोनी। निघाले सर्प करवीर यात्रे लागोनी। कोटीतीर्थी आरंभ करोनी। अन्य तीर्थी करती श्राद्ध पिंडदान।।७।। अंतगृही बाह्यगृही करोनी। केली रामेशादि महाद्वारे ही। तैसेची चार जलशायी अही। आणि चार अन्य द्वारे पाहती।।८।। त्रिकाल निरांजन पाहती। नागतीर्थी त्रिपक्ष निवास करती। मग लिंगाष्टक विलोकनासाठी। निघाले सकल सर्पगण।।९।। पन्नगालयी पडे नागाचे गर। राहे तेथेची तो पवनाशन। जयांसी घडे तयाचे

दर्शन। त्यांचे पापनाशन होतसे।।१०।। चक्रेश्वराख्य महाद्वार। गेले पाहण्या ते विषधर। कात्यायनी पुढे शरमात्रांतरावर। पडे एका पन्नगाचे गरळ।।११।। झाले तेथैची एक विषकुंड। दर्शनमात्र तयाचे केवळ। तेथे करी विषप्रक्षालन। अमृतवाहिनी जीवंती नदी।।१२।। कलहेशाप्रति निघाले भुजंग। मार्गी विष वमे एक नाग। तेथे कुंड अघनाशन नाम। झाले महाकाली पुढे।।१३।। मल्लिकार्जुनास निघाले विषधर। क्षेत्राच्या उत्तरेस एक योजनावर। वमतसे विष एक विषधर। झाले विषकुंड तेथे गाढे।।१४।। आपले विष गेले म्हणून। जाहला तो पन्नग संतुष्ट। नृत्य करी परमानंदे विषधर। सर्व सिद्धीकर तो नागेश्वर।।१५।। पाहून तयाचे आनंदनृत्य। गौरीसह सदाशिव। येऊनी बैसती पर्वतावर। नृत्य नागेशाचे पाहण्या।।१६।। सदाशिव देती नागेशावर। म्हणे शिवासी तो विषधर। माझा असे करवीरी निवास। यास्तव मागणे नसे काही।।१७।। परि जनहितार्थ असे विनंती। करावा निवास या पर्वती। करावे प्रसिद्ध माझ्या स्थानासी। व्हावी दोन क्षेत्रे ख्यात।।१८।। सदाशिव तयासी वदती। कल्लेश नाम तीर्थ तव क्षेत्री। तैसेची सिद्धेश नामे पर्वती। होतील माझी स्थाने ख्यात।।१९।। जेथे विष वमन करती सर्प। तेथे होई त्यांचे स्थान पवित्र। पाहण्या लिंगाष्टक उर्वरित सर्प। गेले तेथे सर्वांचेच पडे विष।।२०।। तेथेच सर्पांचे कुळ वाढले। परि सर्प महालक्ष्मीस विसरले। तयांसी मग खगपतीने वधिले। वाचले जे ते करती देवी स्मरण।।२१।। आले मग ते महालक्ष्मीप्रती। दंडवत ते श्रीस घालती। भक्तीने देवीचे स्तवन करती। म्हणती माते करावे रक्षण।।२२।। तयांसी देवी वदतसे। तीन योजनावर शिळा असे। तेथे देव होते राहिले। महिषासुरासी भीऊनी।।२३।। त्या शिळेवरी माझे पद्मद्वय। मणि पडला मम वैजयंती माळेतून। वज्रेश्वर नामे लिंग झाले तेथ। जे नाशितसे सकल

पाप।।२४।। तेथे राहावे आपण सर्वांनी। फक्त श्रावण शुद्ध पंचमी दिनी।। यावे बाहेरी मम आज्ञेवरुनी। द्यावे सर्वा दारा, पुत्र, धन।।२५।। वज्रेश्वरा समीप मम वास। होता झाला सप्त दिवस। श्रियाल (शिराळे) नामे पवित्र। स्थान जगती होईल प्रसिद्ध।।२६।। श्रीकुंडी श्रियादेवी होऊन। कात्यायनीस्तव मी केला वास। आली कात्यायनी मम भेटीस्तव। नवकोटी सखी घेऊन।।२७।। दिली तयांसी मंगलद्रव्ये। भूमीस मंगलक्षेत्र नाम लाभले। उमटली शिळेवर माझी पदे। म्हणोनी हे स्थान असे पवित्र।।२८।। महालक्ष्मीच्या आज्ञेवरुन। राहिले येथेची नागगण। गेले त्यांचे स्वाभाविक विष। ऐसे पवित्र हे करवीरपट्टण।।२९।। ऐशा पवित्र या स्थानी। करितसे तप पराशर मुनी। येती फार विघ्ने तयासी। परि तपाते तो न सोडी।।३०।। धरी ब्रह्मचर्य करी उपोषण। तप करी पादांगुष्ठी उभा राहून। हिम, ताप वाताग्नी साहून। धरितसे हृदयी श्रीहरिस।।३१।। कठोर तप जाहला अस्थिपंजर। धावली लक्ष्मी बैसोन गरुडावर। आली पन्नगालयी मुनीसमोर। होई ती आपुल्यारुपे प्रकट।।३२।। म्हणे मुने पाहून तव उग्रतपासी। आले येथे वर द्यावयासी। ऐकोनी लक्ष्मीच्या वचनासी। लक्ष्मीकडे मुनी पाहतसे।।३३।। म्हणे नसे मी ही ध्यायिली। परि येथे ही कासया आली। इच्छी मी हरिरूप पुत्रासी। हा वर देण्या नसे समर्थ ही।।३४।। जाणे तया मनीचा विचार श्री। म्हणे हा न जाणे मी विष्णुरुपिणी। कृपायुक्त ती बोले हासुनी। मीच असे विष्णु प्रत्यक्ष।।३५।। पराशर मग म्हणे तिजसी। दाव प्रत्यक्ष विष्णुरुपासी। मग वदे लक्ष्मी पराशरासी। पाही मजठायी तू विष्णु।।३६।। पाहुनी प्रत्यक्ष विष्णुस। पाहुनी चतुर्भुज तो घनश्याम। जाहला पराशरास बहु हर्ष। पत्नीसह करी वंदन विष्णुसी।।३७।। विष्णु तयासी उठवी प्रेमे। करी स्तवन मुनी विष्णुचे। प्रसन्न विष्णु तयासी वदे। मी अन्

लक्ष्मी असे हे अद्वैत।।३८।। दिला वर शुंभनिशुंभादिकासुरांसी। नसेल पुरुषापासून मरण त्यांसी।। तयांचा वध करण्यासाठी। धरीले मी लक्ष्मीरूप।।३९।। लक्ष्मीरूपे वधिले दैत्यांसी। देण्या भुक्तीमुक्ती भक्तांसी। त्याचरूपे केली येथे स्थिती। ऐसे अद्वितीय अनुपम हे विष्णुक्षेत्र।।४०।। रामादिक अवतार जैसे। नसती मजहून भिन्न तैसे। मी आणि महालक्ष्मी मध्ये। नसे भेद रे मुनिराया ।।४१।। झाले मुनिचे संशयनाशन। मग भावे महालक्ष्मीस नमून। वरद ऐसे अष्ट श्लोक करून। स्तवन करी मुनी महालक्ष्मीचे।।४२।। संतुष्ट लक्ष्मी स्तवन ऐकोनी। म्हणे गेली तव भेदबुद्धी म्हणूनी। स्वयं विष्णु तव पुत्र होवोनी। करतील पूर्ण तुझे मनोरथ।।४३।। जाहले पराशर पूर्ण मनोकाम। पावली लक्ष्मी अंतर्धान। भुक्तीमुक्ती प्रदायक करवीर। जाहले पवित्र काशीहूनही।।४४।। पुसे लोपामुद्रा अगस्तीसी। व्यासरूपे जाहला हरि। पराशरापासूनी मत्स्योदरी। ऐसे असे मी ऐकले।।४५।। मुनी तिज कथन करती। त्याच आश्रमी पराशर राहती। भद्रा नदीमाजी गेला मुनी। पुण्यपर्व दिनी भार्येसह।।४६।। नदीमध्ये करोनी स्नान। तीरी मुनीकरी संध्यादि कर्म। बैसले तेथेची देवपूजेस। सत्यवती करी भद्रास्नान।।४७।। पाहिले तिने मत्स्यमत्सिणीस। होते क्रीडत अपत्यांसह। कौतुक पाहता जाहली सकाम। उशीर तिजसी जाहला।।४८।। मुनींनी ज्ञानचक्षुने पाहिले। उशीर होण्याचे कारण कळले। अतिसंतप्त मुनी जाहले। उच्चारिती ते शापवाणी।।४९।। मत्स्यक्रीडा पाहून झालीस सकाम। होईल तुझा मत्स्योदरी जन्म। धरी पतिचरण शापवाणी ऐकोन। उःश्याप देण्यासी विनवितसे।।५०।। पराशर तेव्हा म्हणे तिजसी। जरी जन्मलीस मत्स्योदरी। मम वचन सामर्थ्ये होशील नारी। कारण सत्य असे मम वैखरी।।५१।। सत्यवती

विनवी पराशरांसी। तव पुत्र होणार असे श्रीहरी। यावा तो माझिया उदरी। तैसे वचन देती पराशरमुनी।।५२।। सत्यवती योगबळे देह त्यागी। भारद्वाज मुनींच्या वीर्ये नारी। होऊनी मत्स्यगर्भी राहिली। मत्स तळपतसे गंगेमध्ये।।५३।। लुब्धक तळपता मत्स्य पाही। गेला घेऊनी तो स्वघरी। फाडीता पाहिली मत्स्य उदरी। सुलक्षण कन्या दिसतसे।।५४।। जन्मली ती मत्स्य उदरी। होता मत्स्यदुर्गंध तिचे शरीरी। झाली उपवर ती मत्स्योदरी। कोणही न वरीतसे तिज।।५५।। किराते तिज ठेविले नावेवरी। आला पराशर नदीवरी। जाणले तियेचे दुःख अंतरी। जाहला आरुढ नौकेत।।५६।। नाव घेवोनी आली मध्यभागी। झाला कामयुक्त पराशरमुनी। जाहली लज्जीत ती नारी। मुनी स्वहस्ते धरी तिजसी।।५७।। जनांनी न पाहवे म्हणोन। केला त्याने बर्फ उत्पन्न। मुनी करी तिजसी गमन। अमोघवीर्ये जन्मला श्रीहरी।।५८।। मग पराशर निघाला तेथोनी। व्यास शिर ठेवी मुनीचरणी। पाहुनी आश्चर्य चकित झाली। नारी म्हणे रक्षावे बा मजसी।।५९।। नच तर सुगंधा करावे मज। तैसेच असो अक्षत कौमार्य। जेणे मिळेल मज दुजा वर। मुनिकृपे झाली ती योजनगंधा।।६०।। श्रीहरी आला तव उदरी। जाहली तुझी इच्छा पुरी। करील संकटनाशन हाचि। वेदव्यास नामे पावेल प्रसिद्ध।।६१।। व्यासही मग निघे तपाला। विवश ती म्हणे व्यासाला। मज टाकूनी कुठे निघाला। जाहली बहु खिन्न ती।।६२।। मग व्यास म्हणे खिन्न मातेला। जेव्हा संकट येईल तुजला। तेव्हा माते स्मर मजला। येईन मी अवश्य तुजपाशी।।६३।। ऐशी मत्स्योदरी झाली सुगंधा। चंद्रवंश वृध्यर्थ शंतनु वरी तिजला। मत्स्योदरीच सत्यवती सांगतो तुजला। सत्यवतीचा सुत वेदव्यास।।६४।। पुसे लोपमुद्रा अगस्तींसी। तीर्थे, लिंगे पराशर आश्रमींची। मुनी अगस्ती तिज म्हणती।

सांगीन मी ती तुजसी।।६५।। असे जेथे पराशर आश्रम। होता पर्वत उंच द्वादश योजन। होती लांबी दीड कोस। पाऊणकोस होता विस्तृत।।६६।। हृषिकेश उडाला त्यावरून। झाला साडे अकरा योजन भूमीत निमग्न। उरला असे तेणे बाहेर पर्वत। केवळ दोन कोस जाण की।।६७।। पुसता तिने कृष्ण उड्डाण कारण। अगस्ती मुनी होऊन प्रसन्न। करिती कृष्णकथा निवेदन। श्रवणही कथेचे करितसे पावन।।६८।। कंसवधानंतर श्रीकृष्ण। होता मथुरेमाजी स्थित। चालत आला ससैन्य कालयवन। तेथोनी कृष्णकरी पलायन।।६९।। मानोनी कृष्ण भज भ्याला। यवन तयाचे पाठी लागला। न जाणे तो विष्णु पराक्रमाला। न जाणे तो हरिमाया।।७०।। उल्लंघिले बहुदेश कृष्णाने। श्रमाने दमून यवन बैसे। ते पाहून कृष्णही तेथे बैसे। असे जेथे पराशराश्रम।।७१।। तेथे वाहे हैमा नदी। तिचे शीतलजल तापनाशी। स्नान करे तेथे हृषिकेशी। त्याचे तनुतापे झाले जल शैल्यवर्जित।।७२।। पूर्वेस पर्वती बैसोनी। वाजवी पावा तो श्रीहरी। आले गुराखी ते ऐकोनी। म्हणती कोण हा पितांबरधारी।।७३।। गुराखी रंगले कृष्णासवे। झाल्या तृषित गाई इकडे। निघाल्या गाई जलाकडे। एक गाय हैमानदीत पडली।।७४।। झाली ती कंठगतप्राण जलात। उच्चस्वरे दीनदुःख शब्द उच्चारीत। कृष्णाच्या कानी शब्द येत। पावा सोडून धावला कृष्ण।।७५।। ते पाहून सर्वही गोपजन। नदीच्या त्या जलात शिरून। काढावे गाईस बाहेर म्हणून। करिती प्रयत्न ते गोपाळ।।७६।। पुकारिती मग ते कृष्णास। ऐकोनी कृष्ण गेला मदतीस। कृष्ण हस्तस्पर्श झाला गाईस। जाहली ती दिव्य अप्सरा।।७७।। कृष्णाचे स्तवन करी सुंदरी। म्हणे झाला मम उद्धार हरी। नमुनी कृष्णा ती इंद्रलोका गेली। झाले शोकाकूल गोपाल सर्व।।७८।। तयांचा ऐसा शोक ऐकोनी। नवीन गाय उत्पन्न करोनी। ठेवी

तेथे कृपाघन चक्रपाणि। झाले गोपाळ बहु हर्षित।।७९।। जेथे हैमानदीत पडली गाय। त्यावर उमटले तिचे पाय। जाहले गोतीर्थ पवित्र। स्नाने मुक्ती ते देतसे।।८०।। लोपामुद्रा पुसे कथा गाईची। अगस्ती मुनी सांगती तिजसी। म्हणे स्पर्धा करून वसिष्ठासी। करितसे तप विश्वामित्रऋषी।।८१।। मुनीचे तपोभंग करण्यासी। शक्र पाठवी सुगंधा अप्सरेसी। तेव्हा तपोभंग करण्यासाठी। बैसली अप्सरा ऋषीमांडीवरी।।८२।। शापिती विश्वामित्र तियेस। पशुसम सोडून लज्जेस। ऐसे हीन वर्तन केलेस। जा तू गाय होवोनी वस।।८३।। झाली अप्सरा बहुभयभीत। विनवितसे ती विश्वामित्रास। कृपाघनऋषी म्हणती तियेस। होईल करवीरी तुझा वास।।८४।। चरत असता तेथील वनात। पडशील तेथे हैमा नदीत। लाभेल तुज कृष्णहस्त स्पर्श। त्या पवित्रस्पर्शे होशील मुक्त।।८५।। मग गेला कृष्ण पर्वतावर। वेणू वाजवीत करी नर्तन। त्यास धरण्या धावे कालयवन। परि नाटोपे तो तयासी।।८६।। कृष्ण उडाला ब्रह्मगिरीवरून। तेणे गिरी झाला भूमीमग्न। उरला गिरी दिसतसे बाहेर। जाहले ऐसे लोपामुद्रे।।८७।। जेथोनी असे कृष्ण उडाला। तेथे गिरीस खळगा पडला। उभयमुख नदी ओघ झाला। पूर्वपश्चिम उभय दिशी नदी वाहे।।८८।। कृष्ण फार श्रमला पाहून। चंद्र आला तेथे धावोन। स्वमंडलस्थळ जले अभिषेकून। करितसे तो कृष्णार्चन।।८९।। सकल विश्वाचा जो कर्ता। करोनी राही स्वयं अकर्ता। केवल त्याचे पावन नाम घेता। भवभयाचा होई विनाश।।९०।। ब्रह्म आला त्या पर्वती। करितसे तो कृष्णाची स्तुती। तेणे जाहला प्रसन्न चक्रपाणि। पुसे तयासी काय वांछित।।९१।। म्हणे ब्रह्मा रहावे तू या गिरीवर। हो प्रसिद्ध तव नामे हा शैलवर। हरि म्हणे हा गोमद्‌गिरी नामे नग। उभयन्मुखी नदी गोमन्वती।।९२।। मुचकुंद नृप निजे त्या

पर्वतावर। तयावर झाकोनी स्वपितांबर। कपट करुनी कृष्ण गेला दूर। यवनेश्वर तेथे पातला।।९३।। केला मुचकुंदावर लत्ताप्रहार। कोपे उठे तो निद्रेतून। नेत्राग्निने जाळीला यवन। सांगे कथा मुनी पत्नीस।।९४।। ती पूसे पराशरा श्रमातील तीर्थे। मुनी म्हणती अनेक तीर्थे येथे। सांगीन मी ठाऊकी तितके। ऐक ऐक ग मम प्रिये।।९५।। ब्रह्मेश, कृष्णतीर्थ, गोमत्तीर्थ। पराशरतीर्थ, नागतीर्थ, नृसिंहतीर्थ। सोमतीर्थ, उर्वशीतीर्थ, मदनेश्वर। त्याचे पश्चिमेस असे वसंततीर्थ।।९६।। स्तंभतीर्थ, वाततीर्थ, गंधर्वेश्वर। असे येथेच नागझरी नामतीर्थ। त्याचे दक्षिणेस असे देवकुंड। असे सहाबाणावरी व्याघ्रतीर्थ।।९७।। एका पराशराचे ऐसे स्थान। इतर मुनींचेही आश्रम पावन। ऐशा या करवीर क्षेत्राचे वर्णन। करावे कैसे लोपामुद्रे।।९८।। ऐशा करवीर क्षेत्री वसे। साक्षात हरिमहालक्ष्मी वेषे। करितसे स्वयं रक्षण क्षेत्राचे। ऐसे महान हे करवीर क्षेत्र।।९९।। महालक्ष्मी असे प्रत्यक्ष कृष्ण। अद्वैत तयांचे असे अखंड। परि दृष्टीसी दिसती ते दोन। आम्हा प्रापंचिकासी सर्वदा।।१००।।

**श्रीमहालक्ष्मी चरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।**

चवथा अध्याय

# ।। विजयालक्ष्मी अध्याय।।

**श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।**
**श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री महालक्ष्मी नमः। श्री ग्रामदेवताय नमः।**

व्यासाज्ञे झालासी भारत लेखक। जाहले निर्मित महाभारत। सामर्थ्य तव केवळ शब्दातीत। असशी तूचि सकल विद्यादाता।।१।। करितसे मी करवीर महात्म्य वर्णन। असे ते अपूर्व अगाध स्थान। कैसे करावे नवशतीत कथन। द्यावे सामर्थ्य तूच मजसी।।२।। वंदन माझे तुज महालक्ष्मी। धरिसी भक्तांस्तव रूप शाकंभरी। दुर्गा तू जी दुर्गम दैत्या संहारी। व्हावे प्रसन्न या तव सुतावरती।।३।। वदती अगस्ती लोपामुद्रेसी। प्रयागाच्या वायव्य दिशेसी। जेथे केला वास शुकमुर्नींनी। त्या तीर्थाचा महिमा वर्णिणे अशक्य।।४।। स्वायंभूव मनू झाला ज्ञानी। करिता जाहला धर्मशास्त्रे तो मुनी। वटप्रयागापासून कोसावरी। असे पश्चिम शैलावर त्याचे स्थान।।५।। प्रयागक्षेत्राच्या दक्षिणेस। असे सर्व सिद्धिद कपिलतीर्थ। या क्षेत्राच्या परिसरात। बहुत तीर्थे असती पावन।।६।। शुक्ल, भैरव विशालतीर्थ। व्यास, गालव, गर्ग, विश्वमित्र तीर्थ। वसिष्ठ, अरुंधती मयूरतीर्थ। अनेक तीर्थे असती पंचगंगेत ।।७।। तारक दशाश्वमेधादि तीर्थ। पुढे पश्चिममुखी पंचगंगा थोर। मिळाली जीवंती पंचगंगेस। तेथे सर्व तीर्थ जेथे शंकरवसे।।८।। एकेक बाणावरी पंचगंगेत। असती तीर्थे कृष्णा संगमापर्यंत। त्याचे वर्णन करण्या शेषही

असमर्थ। आयुष्य ब्रह्माचे पडे अपुरे।।९।। ऐसे हे स्थान अपूर्व। करी महापाप्याचाही पापनाश। यमदूत बाधाही नसे येथे। ऐसे पवित्र क्षेत्र असे हे।।१०।। या करवीराच्या प्रदक्षिणेचे पुण्य। ब्रह्माही न करू शके वर्णन। येथील स्नान अतिपुण्यकारक। कैसे वर्णन करू मी याचे ।।११।। जे समंतात जलशायी रक्षित। जे असे पाचकोस परिमित। लिंगरुपी लिंगाकार ख्यात। कोल्हापूर नाम असे ज्याचे।।१२।। अनंत जन्मींची पुण्यें असती। तेचि जन करवीरा येती। तेचि लक्ष्मी दर्शन पावती। तयांसीच लाभे भुक्तीमुक्ती।।१३।। ब्रह्मावर्त आर्यावर्त आणिक। मध्यदेश ऋषिदेश नामक। हे चार सर्व देशांत प्रमुख। करवीर असे श्रेष्ठ ह्याहुनी।।१४।। हिमाद्रिपासून दक्षिण समुद्रापर्यंत। जे खंड असे नाम भारत। भरताची संतती वसे त्यात। म्हणुनीच त्या देशा भारत म्हणती।।१५।। ऐसे सांगत लोपामुद्रेस। आले अगस्ती कऱ्हाडास। मार्गी पूजुनी वटेश्वरास। तैसेची शैलकेदारा नमिती।।१६।। तेथून पाहती ते करवीरा। पाहुनी दुरुनी त्या पापहरा। आले हर्षित ते करवीर क्षेत्रा। जाहले अगस्ती मुनी धन्य।।१७।। करवीर क्षेत्र दिव्य असे। हे श्रीच्या करी वसे। चक्राकार अतिसुंदर असे। दक्षिणवर्ती शंखासम दिसे।।१८।। हे वोढले धनुष्यासम दिसे। पंचगंगा, वरुणा गुण साजे। म्हणोन सज्ञचाप भासे। ऐसे विचित्र दिव्य क्षेत्र हे।।१९।। या करवीर धनुष्यासी। अनेक नद्या गुणवती दिसती। कित्येक बाणासम भासती। जणू सज्ञचाप धनुष्य दिसे।।२०।। असती प्रासाद, यज्ञ स्तंभ देवळे। समुदाय सिद्ध, वनवासी, बटुंचे। निवास वेदाभ्यासींचा येथे। सन्यासी यज्ञकर्ते वसती येथे।।२१।। होती श्रीची त्रिकाल निरांजने। तैसेची होती नृत्य, वाद्य, गायनें। हरिनामोच्चार येथे सुस्वरें। तयासह जयजयकार गुंजती।।२२।। ऐसे असे वेगवेगळे इतरत्र। परि करवीरी असे ते एकत्र। तेणें करवीराचे महत्त्व

सर्वत्र। असे फार जाण प्रिये।।२३।। श्रीविष्णूने ब्रह्मा आज्ञापिला। सांगे तयासी प्रजा निर्मायला। तो ब्रह्मशैली करून तपाला। भार्येसह येई ये स्थानाला।।२४।। करितसे मग तो यज्ञ। करी ब्रह्मा महोत्सव। तेणे अति पवित्र हा देश। हे स्थानही झाले ख्यात।।२५।। कश्यप होता, गालव पोता। वसिष्ठ प्रणेता, गार्ग्य उद्‌गाता। विश्वामित्र प्रतिवक्ता। ऐसे स्थापुनी करितसे यज्ञारंभ।।२६।। पहाया आले देव, मुनि असंख्य। ब्रह्मा करितसे तीर्थ सुरूप। दशाश्वमेध नाम देऊनी त्यास। ब्रह्मयाची मूर्ती स्थापिती तेथे।।२७।। जे दशाश्वमेध तीर्थी स्नाती। ब्रह्मेशास भावे पूजिती। मिळे दश अश्वमेध फळ निश्चिती। ऐसा देती वर सकल।।२८।। नाना द्रव्यें यज्ञ करिती। दशाश्वमेधांची करिती समाप्ती। अवमृत स्नानाची चिंता करती। सकल एकत्र स्नान कैसे घडे।।२९।। ऐसे चिंताक्रांत पाहुनी त्यांसी। जे होत्रादि पंचऋषी। आणिती तेथे पाच नद्यांसी। नाम क्रमें सांगतो येथे।।३०।। आणिल्या कश्यप गाल्व गार्ग्यांनी। शिवा, भ्रदा, कुंभी नद्या तिन्ही। वसिष्ठ, विश्वामित्र मुनींनी। सरस्वती, भोगावती आणल्या।।३१।। ऐशा पंचगंगा असती। त्यात प्रकट चार वाहती। असे गुप्त नदी भोगावती। या पाच नद्यांमध्ये।।३२।। गोदा, भीमा, आणि गोमती। स्व स्नानें परिमित फळें देती। परि पंचगंगेच्या माहात्म्याप्रती। ब्रह्मदेव म्हणे अपरिमित।।३३।। करुनी यज्ञाची समाप्ती। पंचगंगेची वाट ते पाहती। तव ती दशाश्वमेध तीर्थासी। स्वप्रवाहे झाकीत आली।।३४।। जेणे झाले देवमुनी प्रसन्न। झाले करिते अवभृत स्नान। शांतीसुक्ते कश्यपादि मुनिगण। करती ब्रह्मदेवा अभिषिंचन।।३५।। ब्रह्मादिदेव वस्त्रे नेसोन। गंधलेपन मग करून। कश्यपादिंचे पादप्रक्षालून। गंध, माला भूषणें देती तया।।३६।। तयांचे आशीर्वाद घेऊन। राहिले तेथेची देवगण। दशाश्वमेध माहात्म्य कथन।

करणे अशक्य लोपामुद्रे।।३७।। करवीराचे मार्गे करून। उमेसह आला ईशान। दशाश्वमेध नामे हे तीर्थ। असे बहु विख्यात।।३८।। येथे ब्रह्माचे देवालय। घेता येथे ब्रह्माचे दर्शन। तीर्थी या करून स्नान। दहा अश्वमेध फळ होते प्राप्त।।३९।। पूसे पार्वती शिवासी। सांग वेदाध्यायी द्विजांसी। दुर्मिळ दशाश्वमेध फळासी। केवळ स्नानमात्रे कैसे होई।।४०।। शिव वदती पार्वतीला। नसे भक्ती ज्या नराला। कैसी पावन करती तयाला। भक्तांसी मात्र स्पर्शमात्रे देती मुक्ती।।४१।। सांगती पार्वतीस शिव। या तीर्थासमीप मी मरेन। तू रुदन करी मम स्त्री होऊन। दहनासाठी शव न उचले।।४२।। ऐसे म्हणून शिव त्यागी देह। तया समीप रडे सती स्त्री होऊन। बहुत विप्र तेथे येवोन। करती समाधान तियेचे।।४३।। रचिली त्यांनी दहनार्थ चिता। परि शव न उचले तयांना। महाआश्चर्य वाटे समस्ता। म्हणती काय करावे आता?।।४४।। त्या क्षेत्री राजा गंड नाम। केली तयाने सूर्यभक्ती महान। दिधले सूर्याने सर्वदा कुंडल। दिले रत्नपात्रही त्यास।।४५।। सूर्य देई त्यास नित्य अन्न। परि सूर्याने सांगितले होते त्यास। जर न झाले येथे शवदहन। तोवर अन्न न येईल।।४६।। ते दिनी अन्न न मिळे तया। जाणोनी गंड तेथे आला। जाई उचलाया तो प्रेताला। परि न उचलता येई त्यास।।४७।। सतीने सांगितले राजाला। जो आजची करी दशाश्वमेधाला। तोचि उचलू शकेल शवाला। झाला गंडराजा चिंताक्रान्त।।४८।। होता तेथे धर्मशर्म्मा नाम विप्र। निघे अपराण्ही तो भिक्षेस। होता तेथे विष्णुधर्मरत सदाचारा दक्ष। पाहे सदा तो श्री निरांजन।।४९।। पूसे तो का न केले शवदहन। राजा सांगे तयास कारण। म्हणे दशाश्व मेधी करता स्नान। अशक्य काय असे तयास कारण।।५०।। विचारी तो किती अश्वमेध। सांगती आजची दशाश्वमेध। मग तैसे संकल्पोन दशाश्वमेधी

स्नान। करीत तर्पण पूजन पितर, देवांचे।।५१।। म्हणे मग तो सकल जनांस। येथे मृत न होती शव। वेष्टिती तयास विष्णुदूत। जीवंताहून मृत धन्य येथे।।५२।। ऐसे वदोन स्मरोन हरिसी। ठेवी चितेवर तो शवासी। तया सह सहगमन करे सती। लावीती अग्नी जाळाकया।।५३।। अग्नि स्पर्शे जाहले सुवर्णकांती। धर्मशर्म्यासह ते विमानी बैसती। जाती ते विष्णुलोका प्रती। गंडराजादि जन झाले आश्चर्य चकित।।५४।। पार्वती म्हणे सदाशिवास। करवीरी असती काशीचे सर्व गुण। परि जाणवते मज एक न्यून। नसे तेथे तारकमंत्र श्रवण।।५५।। शिव म्हणे न जाणिसी महिमा। येथे नको वेदाध्ययन कुशलता। नसे तारकोप देशाची आवश्यकता। त्याविण झाला मुक्त धर्मशर्मा।।५६।। म्हणे शिव मग गौरीस। प्रत्यक्ष विचारून मी श्रीस। उपदेशीन तारकमंत्र प्रेतास। गौरीसह तो श्रीस्तवन करी।।५७।। असशी प्रफुल्ल कमललोचना। गंडोल्लसत्कुंडलमंडना। चंद्रमुखी तू हरिसी अंगना। नमन शत तुज चरणी।।५८।। प्रसन्न होऊनी श्री म्हणे शिवाला। लोकहितार्थ तुम्ही येथे आला। तुमचे मुळे येई तीर्थपण या तीर्थाला। रहावे उभयता करवीर क्षेत्री।।५९।। रहावे येथे माझे उजवीकडे। जेथे रहाल तेथे रोकडे। रौद्रगया नामें क्षेत्र गाढे। होईल इच्छितार्थ देणारे।।६०।। प्रथम पुरवून इच्छित काम्यर्थ। करावा जनांस तारक मंत्रोपदेश। जो पूजी मज न करी तवपूजेस। तयाचे तीर्थकर्म होईल निष्फळ।।६१।। श्रीची ऐसी आज्ञा मानून। श्रीच्या दक्षिणेस ईशान। स्त्रीसह राहे हे महिमान। दशाश्वमेधाचे असे प्रिये।।६२।। सांगती अगस्ती सर्व तीर्थ माहात्म्य। नाशितसे ते बहुपातकांस। या तीर्थामध्ये करून स्नान। घ्यावे मग लिंगदर्शन।।६३।। या स्थानाची उत्पत्ती ऐक। येथे एकदा ब्रह्म करी यज्ञ। बोलवी तो सर्व देवांस। परि देवांसी पडे प्रश्न।।६४।। आलो यज्ञास्तव करवीरी। तेथे

तीर्थ लिंगे आहेत भारी। करावे तीर्थविधी तीर्थांवरी। परि ते कैसे घडेल आम्हासी।।६५।। पुसती देव सकल बृहस्पतीसी। तीर्थयात्रा आणि यज्ञविधी। घडावे दोन्हीही आम्हासी। सांगावी तुवा युक्ती ऐसी।।६६।। गुरू सांगती आणती सकलतीर्थ। करा एकची तीर्थ विमल। देईल जे स्नाने स्वर्गादि फळ। ऐसे पवित्र असावे ते।।६७।। आणोनी सर्व करवीरस्थ तीर्थ। करती तेथेची एक तीर्थ। देती नाव त्यासी सर्व तीर्थ। देती अनेक वर तीर्थासी।।६८।। मग तेथे करुनी स्नान। करिती देव सर्वेश्वराचे पूजन। होई प्राप्त अष्टतीर्थ यात्राफळ। केले मग ब्रह्माचे यज्ञास सहाय्य।।६९।। अवभृत स्नान करण्यासाठी। पाच ऋषींनी जिला आणिली। येथे ती पंचगंगा आली। करी आच्छादित ती तीर्थाला।।७०।। जेथे जीवंती नदी मिळे। तेथे पश्चिममुखी गंगा वाहे। सर्व तीर्थ हे तेथे आहे। त्यांच्या जळे मिश्रीत जे।।७१।। पंचगंगा जीवंती युक्त। ती पश्चिममुखी असे वाहत। तिने आच्छादित सर्व तीर्थ। प्रत्यक्ष श्रीरंग राहे तेथे।।७२।। आले अगस्ती करवीर क्षेत्री। करुनी पूजा देहली विनायकाची। आले गंगाजल युक्त मनकर्णिकेसी। नाहुनी देवऋषी तर्पिती।।७३।। नमुनी शिवासन्निध भवानीस। करती नमन महेशास। गंध, पुषे, बिल्वपत्रे अर्पून। संतोषविती विश्वेशास।।७४।। प्रदक्षिणामार्गे निघाले देवीदर्शना। वाटेत करुनी अनेक तीर्थांना। गरुड मंडपी नमुनी गरुडा। मुक्तीमंडपी तो जातसे।।७५।। नमिली सर्व सिद्धीद महाकाली। असे जी देवीच्या उत्तरेसी। मुख जिचे असे दक्षिणेसी। करितसे अगस्ती तिची स्तुती।।७६।। मग आले देवीच्या दक्षिणेस। जेथे महासरस्वती उत्तराभिमुख। करुनी भक्तिभावे तिचे पूजन। स्तवित असे अगस्ती तिजला।।७७।। मग आला अगस्ती द्वाराते। काळवेताळ असे रक्षक तेथे। पुजूनी मग काळवेताळांते। आला अगस्ती गर्भागारी।।७८।।

अगस्ती महालक्ष्मीस पाहे। जी रत्नखचित सिंहासनी बैसे। मातुलिंग, गा, खेट, पानपात्र असे। जिच्या चारही हस्ती पै।।७९।। जी मुक्ताहारांनी युक्त। दिव्य गंध विभूषित। किंकिणींनी ती मंडित। दिव्यमालांबर धरा।।८०।। प्रवाल, वैडुर्य, नीलादिमणि। असती जिच्या सर्व भूषणी। नवकोटिसखी युक्त कात्यायनी। निरांजती जियेसी सदा।।८१।। निरांजन, समयी चौसष्ट योगिनी। तत्पर सदा जिचे सेवनी। चामर, व्यंजनादि घेऊनी। सदा उभ्या असती जिथे।।८२।। ऐशा लक्ष्मीस पाहुनी। मुनी आनंदी पावे मनी। देवीस साष्टांग नमोनी। स्तोत्र आरंभ करितसे।।८३।। मुनीचे हे महालक्ष्मी अष्टक। आहे भुक्तीमुक्ती दायक। पठन करिता जाई दारिद्र्यदु:ख। सर्व कामना होती पूर्ण।।८४।। लक्ष्मी विष्णुंची सूक्ते म्हणून। गंगादि पुण्यजले घेऊन। महालक्ष्मीस भक्ती करून। करी अभिषेक अगस्ती।।८५।। अर्पून दिव्य वस्त्रे चंदन। जाती चंपकादि पुष्पगण। दिव्यधूप रत्नदीप देऊन। षड्रसान्न नैवद्य दाखवी।।८६।। मग उच्चारोनी नाम सहस्रा। पृथक् पृथक् वाही बिल्वपत्रा। तव मार्कण्डेय पूसे नारदा। सांगावी ती सहस्रनामें।।८७।। नारद म्हणे मार्कण्डेयाला। हे उत्पन्न झाले केंव्हा। देवी महिषादिक मारी जेंव्हा। ब्रह्मदेवाने केले सहस्रनाम।।८८।। हे जे ब्रह्मासांगे सनत्कुमाराला। तेणे कथिले योग्याला। ते मी सांगीन तुजला। सिद्धीदायक नाम सहस्र।।८९।। पुसती मुनी सनत्कुमारा। कैसी होईल भुक्तीमुक्ती। दारिद्र्यनाश ब्रह्मविद्याप्राप्ती। सांगावे तुम्ही आम्हासी।।९०।। सांगे सनत्कुमार नामसहस्र। जे करी पापनाशन। अष्टैश्वर्य सिध्दिंचे साधन। असे बहु पवित्र, पुण्यप्रद।।९१।। साक्षात विधिविष्णु शिवांनी। या स्तोत्रे स्तविली लक्ष्मी। मग श्रीसुक्तें तिज स्तवुनी। पुजिली तिजसी सर्वांनी।।९२।। तेणे झाली महालक्ष्मी प्रसन्न। म्हणे मागा इच्छित वरदान।

विनविती त्रयी महालक्ष्मीस। असो आमचा अभेद ईश्वरासी।।९३।। करिता नाम श्रवण, पठण। द्यावे तयासी वरदान। दुःख नाश दारिद्र्य भंजन। आरोग्य विपत्ती निवारण।।९४।। द्यावे तया अणिमादि ऐश्वर्य। द्यावे तया काशीमरण। वैराग्य, स्वेच्छामृती साम्राज्य। तारकोपदेशही करावा।।९५।। सनत्कुमार म्हणे हे ऐकून। महालक्ष्मी तथास्तु म्हणोन। पावली क्षणात अंतर्धान। त्या तिघांसमोरची ।।९६।। तुम्ही सर्व मुनी शांतपार। म्हणावे सर्वदा नामसहस्र। दारिद्र भवरोगही सत्त्वर। निःसंशय जातील।।९७।। व्रतस्थ असोन अष्टमीस। चतुर्दशी किंवा नवमीस। विशेषे करून पौर्णिमेस। आणि अमावस्येस म्हणावे।।९८।। तेणे सर्वसिद्धि प्राप्त होतील। जो हे नित्य नियमे म्हणेल। तो सर्व इच्छा कामना पावेल। जगामाजी योगीजन हो।।९९।। संवाद ऐसा सनत्कुमार। आणि मुनिश्रेष्ठांचा। सांगे महिमा सहस्रनामाचा। वर्णिण्या समर्थ स्वामीच असती।।१००।।

**श्री महालक्ष्मी चरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।**

पाचवा अध्याय

# ।। विद्यालक्ष्मी अध्याय ।।

**श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।**
**श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री महालक्ष्मी नमः। श्री ग्रामदेवताय नमः।**

करितो नमन स्वामीचरणासी। द्यावी मती त्यांनी मजसी। वर्णन करण्या महालक्ष्मीसी। उसळे शब्दसागर मनसी।।१।। करती स्तुती मुनी अगस्ती। करती श्रीस सपत्नीक प्रणती। मागती करवीरी वसती। देवी तयासी करी माया मोहीत।।२।। म्हणे महालक्ष्मी तयासी। झाले संतुष्ट मी चित्ती। घेऊन मम क्षेत्र दर्शनासी। झाला उभय कृतार्थ।।३।। करी अगस्ती तिजसी नमन। भक्तियुक्त बोले वचन। द्यावे मज वाराणसीद्वयात स्थान। महालक्ष्मी सर्वदा।।४।। केले जे मी हे तुझे स्तोत्र। असो सर्वा दारिद्र्यनाशक। करी पठन जो या स्तोत्रास। होवो सुखी तो सर्वदा।।५।। म्हणे महालक्ष्मी अगस्तीसी। तव भय असे विंध्यासी। म्हणून धारण करी लघुरुपासी। केलासी तू त्रिलोकीं उपकार।।६।। काशी द्वयातील वाराणसीत। होता तवस्थिती विंध्यपर्वत। तुझे काशी न सोडावी हे व्रत। ऐकून होईल तो वर्धमान।।७।। परोपकाराचे फळ तुला मिळाले। म्हणून मम क्षेत्रदर्शन झाले। मुने तुज बहु पुण्यफळें। हे करवीर होय प्राप्त।।८।। आता ऐक हे मुनिश्रेष्ठ। येथून किंचित दूर शैलपर्वत। कनिष्ठ शिवपुत्र स्कंद। वसे तयावर तो मयूर वाहन।।९।। गौरी इच्छी तयाचा विवाह। बोलावी त्यासी वारंवार। परि न ये तो महादुष्ट। परि तू असशी परम प्रतापी।।१०।।

त्रैलौक्य तव भय धरी। भीतसे तुज विंध्याद्रि। वातापीइल्वलाचा वध करी। भीतसे तुज विंध्याद्रि। ऐसे सामर्थ्य असे तुजपाशी।।११।। असशी तू परोपकारी। जावे स्कंदाप्रती सत्त्वरी। आणूनी तया संतोषवी गौरी। पावशील तू महापुण्य।।१२।। ऐकूनी अगस्ती दुःखित। म्हणे माते काशीत्याग दुःख। विसरलो करवीरी राहावे म्हणोन। का तू मज बाहेर काढिशी।।१३।। जाणिसी माते मम हृदय। काय अन्य मी प्रार्थू तुजला। त्यागितो मी आपुले प्राणाला। ऐसे म्हणून स्वस्थ पडला।।१४।। उठविले प्रेमे तया लक्ष्मीने। म्हणे करवीर क्षेत्राच्या दर्शने। झालासी कृतार्थ तू मुने। याच्या दर्शनेच लाभे भुक्ती मुक्ती।।१५।। अनंत तीर्थे माझे क्षेत्री। आहेत मुने पदोपदी। पवित्र लिंगे तीळतीळावरी। असती येथे अगस्ते।।१६।। नरास बहु दुर्मिळ ही दर्शनें। दिला षण्मास त्याकारणे। होतील तितुकी कर त्वरेने। षष्मासावरी येथे राहू नको।।१७।। पुढे एकूणतिसावे द्वापारी। काशीद्वयांच्या अभ्यंतरी। यथेच्छा मग निवास करी। पाहिजे त्या काशीमध्ये।।१८।। काशीद्वयाचे आख्यान। पूर्वी स्कंदा सांगे ईशान। स्कंद करील तुज कथन। तेणे लाभे काशीवास पुण्य।।१९।। क्षेत्र महात्म्याचे श्रवण। जो करी अन्यत्र राहून। तद् वासाचे फळ पावे जाण। राजा इंद्रसेना सम।।२०।। पूसे अगस्ती महालक्ष्मीस। कोण राजा इंद्रसेना नाम। करवीर माहात्म्य ऐकोन। कैसे फळ मिळाले त्यास।।२१।। सांगे लक्ष्मी इंद्रसेन कथा। पाटली पत्तन नृप होता। धर्मपरायण तो राजा। आसमुद्र पृथ्वी जिंकीली त्याने।।२२।। करी पुत्रवत प्रजापालन। जाणे तो लक्ष्मी विद्युच्चंचल। पुसे मुनींसी मुक्तिकारण। करवीर माहात्म्य मुनी सांगती।।२३।। करवीर माहात्म्य श्रवण करोन। राज्यात मग अमात्य ठेवून। सवे स्त्री, कोश घेऊन। हर्षयुक्त निघाला राजा।।२४।। श्री म्हणे मजला पाहून। माझे

नीरांजन देखून। मुक्तीमंडपी कथा श्रवण। माने कृतकृत्य तो स्वतःसी।।२५।। दुसरे दिनी कोटीतीर्थी करुन स्नान। हिरण्याश्राध्द करी इंद्रसेन। करी मग तुलापुरुषदान। सुवर्णरत्नें करी समर्पण।।२६।। नंतर रुद्रगयादि तीर्थे करुन। यथायोग्य दानादि करुन। मुद्‌गलेश पद्मजादि पूजोन। जेववी ब्राह्मण सहस्र।।२७।। मम आज्ञे पद्मजा मुद्‌गलेश। यांनी दिला राजास पुत्र एक। जाहले पूर्ण रायाचे मनोरथ। मम दर्शनानन्तर तारकेश्वर पूजन करी।।२८।। मम मुक्तीते इच्छी तो नृप। मग तारकेश्वराच्या समीप। आश्रम करुनी दिव्यरुप। पत्नीसह इंद्रजीत राहीला।।२९।। राजा तेथे राहीला ऐकोन। राज्यलोभाने तयाचे अमात्य। करिती परस्परांसी युध्द। त्यांनी प्रजेस बहु त्रासीले।।३०।। पीडीत प्रजा आल्या करवीरी। हर्षे केले सर्व श्राध्द विधी। मग जाती शरण राजासी। निवेदिती आपुले दुःख।।३१।। म्हणती ते इंद्रसेनासी। तूच आमुचा राजा असशी। येऊन सांभाळी राज्यासी। करावे आमुचे दुःख निवारण।।३२।। करावे प्रजेचे रक्षण। राजा हेच श्रेष्ठ तप, ज्ञान। लक्ष्मी म्हणे हे ऐकोन। बहु दुःखी झाला राजा।।३३।। राजा म्हणे मग लक्ष्मीला। त्यागुनी करवीररूप निधानाला। जाऊ कैसा मी ग्रामाला। क्षेत्रवियोगे राज्य कैसे रुचेल।।३४।। धनच काय प्राणही देवून। करावे आपुले प्रजारक्षण। असे हाच विहीत राजधर्म। वेदशास्त्रे सांगती।।३५।। या कारणे प्रजेचे रक्षण। आणि करवीरी अवस्थान। दोन्हीही व्हावे मजकडून। सांगावा ऐसा उपाय मजसी।।३६।। लक्ष्मी म्हणे मग राजासी। प्रजारक्षण हा धर्म राजासी। याकारणे जावे स्वग्रामासी। लोकोपकारार्थ करावे राज्य।।३७।। परोपकारास्तव जो नर। राहील अन्यक्षेत्री तर। करवीर माहात्म्य श्रवण करील जर। करवीरवासाचे फळ मिळेल त्यासी।।३८।। पहा इंद्रसेना मी शिवास। होते पाठविले

दक्षिणेस। सोडावे लागले करवीर क्षेत्रास। परि शिव करी करवीर स्मरण।।३९।। पूर्वी ब्रह्मदेवे निर्मिले असुर। करती ते रण दिव्यशत संवत्सर। युद्धात जिंकती दैत्य। तेहतीस कोटी अमरगण।।४०।। सर्व देव गेले ब्रह्मापासी। ब्रह्मासह आले ते शिवापासी। गेले ते सकल शरण विष्णुसी। करती सर्व मिळोन विचार।।४१।। वराच्या बळें दैत्य दुर्जन। न मरती ते पुरुषापासून। मग मिळोन सारे देवगण। करवीर क्षेत्रासी आले।।४२।। जाणिला देवीने त्यांचा भाव। म्हणे व्हावे युद्धास तयार। ऐकोनी सिद्ध झाले सर्वजण। दक्षिणाब्धीतटी ते ठेले।।४३।। परि दैत्यही सिद्ध झाले रणा। ऐकोनी श्रीस वाटे करुणा। म्हणून संधीस्तव ईशाना। दैत्यांकडे तिने पाठविले।।४४।। शिववाक्ये कोपले असुर। आले करवीरी करण्या रण। मग श्रीने तया वधिल्यावर। करवीर मरणे ते मुक्त झाले।।४५।। लक्ष्मी म्हणे इंद्रसेनास। जाऊन तू सांभाळ राज्य। करी श्रवण करवीर महात्म्य। तेणे तुज पुण्य लाभेल।।४६।। श्रीचे म्हणणे करून मान्य। स्वराज्यास जाई इंद्रसेन। प्रतिपाळी तो प्रजेस। झाली सुखी त्याची प्रजा।।४७।। काही काळानंतर स्वसुतास राज्य देऊन। राही स्वतः निस्पृह होऊन। अहोरात्र करवीर आख्यान। ऐकतसे इंद्रसेन राजा।।४८।। माझ्या क्षेत्राचा महिमा तुज। करील श्रुत षडानन। तेणे करवीरवासाचे पुण्य। तुजसी लाभेल हे मुने।।४९।। महालक्ष्मीस भावे नमून। मुक्ती मंडपामाजी येवोन। तेथे धर्मकथा श्रवण करोन। श्रींचे निरांजन पाहे मुनी।।५०।। नंतर स्वआश्रमा करी गमन। पूर्वकल्पी जेथे आपण। लिंग आणि तीर्थ करून। होता राहिला अगस्ती मुनी।।५१।। म्हणे मग अगस्तीस सती। आपण मजसह आजच आलासी। तरी तुझे तीर्थांची कैसी। स्थिती असे न कळे मज।।५२।। अगस्ती म्हणे पूर्व कल्पांतरी। करवीर महिमा ऐकोन नारी। काशीस सोडोन या

करवीरी। राहिलो होतो मी पूर्वी।।५३।। तेंव्हा केले होते मी तप। तेणे महालक्ष्मी झाली प्रसन्न। म्हणाली संतोषून ती मज। घेई मागून रे वरदान।।५४।। म्हणालो मग मी महालक्ष्मीस। माझे नामे व्हावे लिंग तीर्थ। असावे ते तीर्थ अधनाशक। देव, दैत्य, मुनि, नर व्हावे तेणे पावन।।५५।। श्रीने दिले वरदान मज। झाले मम नामे लिंग तीर्थ। जेंव्हा पंचगंगा येथे येत। तिने बुडविली दोन्ही तीर्थ।।५६।। श्री वरे झालो पूर्णकाम। केला हाचि पहिला आश्रम। म्हणून येथे पुनः विश्राम। माझे तीर्थासमीप केला।।५७।। कल्पांती अब्धीत पृथ्वी बुडती। परि या तीर्थांची ऐसीच स्थिती। म्हणून जरी झाले प्रलय किती। हे क्षेत्र अक्षय राहिले।।५८।। श्रीच्या करी हे क्षेत्र असे। अंतरिक्ष ही भूमीवर नसे। प्रलयी नीर वाढे जैसे। तैसे तैसे श्री ऊर्ध्व करी।।५९।। भूवरी अनेक नगरे असती। तैसे हे न मानावे सती। विष्णु स्वयं याच्या उत्पत्तीसी। करी म्हणोन हे लोकोत्तर।।६०।। सूर्योदयी मुनी करी स्मरण। श्री, विश्वेश्वर, भवानी, रंकभैरव। स्मरून कुंडलेश्वर, कुक्कुटेश्वरास। मनिकर्णिका करी स्नान।।६१।। विश्वेश्वरादि लिंगाचे पूजन करून। महालक्ष्मी देवीचे करी अर्चन। मग पाहून श्रीचे निरांजन। प्रदक्षिणा अगस्ती करितसे।।६२।। मुक्तीमंडपी येऊनी अगस्ती। अंतर्गृही यात्रा संकल्पकरी। मग मुनी महालक्ष्मीस नमी। विधे दक्षिणोत्तर मानसे करण्या।।६३।। करी मुनी कोटीतीर्थ, पुष्करतीर्थ। राम, सीता, त्रिजटातीर्थ। करी नृसिंह तीर्थ पवित्र। नंतर करितसे प्रल्हादतीर्थ।।६४।। मग आले जेथे शुद्धाब्धितीर्थ। म्हणती तयासी रंकतीर्थ। झाले यासी ऐसे कारण। शतवर्षे लोकदुर्भिक्षे पीडिले।।६५।। तेंव्हा शिवादि सर्व देव मुनी। आले सकल महालक्ष्मी प्रती। म्हणती तिज तूच माता। करिती सारे तिची स्तुती।।६६।। दुर्भिक्षे थांबले स्वाहास्वधा वषट्कारण। म्हणती श्रीस करी

रक्षण। ऐकोनी देवमुनींचे स्तवन। झाली महालक्ष्मी प्रसन्न।।६७।। सातवा समुद्र शुद्धाब्दितून। आणी जल पाताळ मार्गे करून। आणीतसे महालक्ष्मी जीवन। तेणे झाले शुद्धाब्धितीर्थ।।६८।। नवकोटी सखीयुक्त श्री। विशाल तीर्थी स्वयंपाकघर करी। शाखा शिजवून परोपरी। सुर, मुनीवरांसी ती जेववी।।६९।। ते पाहून आले दैत्यगण। तेथील जल फळे भक्षून। अतिसबल ते दैत्यगण। सर्व देवांसी जिंकीती।।७०।। आली श्री अष्टभैरवांसह। तेणे पळाले असुरगण। जल राखाया स्थापिले अष्टभैरव। अष्टदिशेसी तेथे।।७१।। देवीने देवगण शाखांनी भरीले। भाज्या चारुनी तया पोषीले। त्यामुळे देवांनी नाम दिधले। शाखंभरी म्हणूनी तिजसी।।७२।। विशाल तीर्थाचे दक्षिणेस। लक्षतीर्थाचे पश्चिमेस। श्रीसिद्ध बटुकाचे पूर्वेस। शाखांभरी स्थापून तीर्थ करती।।७३।। ये तीर्थी स्नान करून। जे करती शाखंभरी पूजन। तयांचे दुःख, दारिद्र्य निर्मूलन। होई परमगती लाभे त्यास।।७४।। पौष शुक्ल पक्षामाजी। यज्ञ आणि अर्पूनी भाजी। जो शाखंभरीचे पूजन करी। तयासी इहपरत्र फळ लाभे।।७५।। ऐसा या तीर्थासी वर देऊनी। वृष्टीची इच्छा मनी धरुनी। शाखंभरीसी भावे पुजूनी। पावले ते बहु वृष्टी।।७६।। शुद्धाब्धीचे रक्षिण्या जल। जे स्थापिले होते भैरव। तयांतील एक भैरव। श्री क्षेत्र वासार्थ तप करी।।७७।। जाहली देवी तया प्रसन्न। दिले त्यास रंकभैरव नाम। म्हणे येथे असेल तव वास। क्षेत्रपाळ रूप धरुनी।।७८।। रंकतीर्थ करुनी स्नान। घेती जे तुझे दर्शन। त्यांचे सकल मनोरथ पूर्ण। अक्षय्य पद लाभेल त्यास।।७९।। जे होते पूर्वी शुद्धाब्धितीर्थ। जाहले तेचि रंकतीर्थ। रंकभैरवाचे दर्शने राक्षस। तेही येथे मुक्ती पावती।।८०।। नंतर मुनी अगस्ती। लक्षतीर्थ लक्षेश्वर महिमा वर्णिती। येथे श्रीने लक्ष दैत्य वधिले। जाहले ते येथे मुक्त।।८१।। पूर्वी लक्ष दैत्य

उन्मत्त झाले। आली श्री तया मारायाते। दैत्य मनोगत जाणीले श्रीने। म्हणे मागा वांछित वर।।८२।। दैत्य विनविती श्रीलक्ष्मीसी। म्हणे आम्हा तू येथे मारीसी। प्राप्त होवो या तीर्थासी। लक्षतीर्थ ऐसे नाम।।८३।। या तीर्थाचे करिता दर्शन। करावे तयास लक्षतीर्थांचे फलदान। तैसेच लक्षेश्वर नामा ईशान। राहो येथे तव कृपे।।८४।। नंतर मुनी आले अश्वतीर्थी। सांगती त्याचा महिमा सतीसी। झाला अश्वमुक्त माकुट तीर्थी। म्हणून या तीर्थास अश्वतीर्थ म्हणती।।८५।। सुशर्मा नाम पंगु ब्राह्मण। मिताहारी भक्षी कोरान्न। त्या द्विजाचा होता एक अश्व। त्यावर बैसोन घेई श्रीदर्शन।।८६।। आले अश्विन कार्तिक मास। निघाले सर्व सुर तीर्थयात्रेस। करती श्रीचे पूजन, अर्चन। धूप, दीप, नैवेद्य, श्रीस अर्पिती।।८७।। निघाले ते तीर्थयात्रेस। पंगुद्विज निघे अश्वावर बैसोन। गर्भ, अंतर्गृही दक्षिणोत्तर मानस। यथाक्रमे ते करी ती।।८८।। द्विजाचा अश्व झाला श्रांत। जाहला तो तृषापीडित। या तीर्थी करून जलपान। मरण पावला तत्क्षणी।।८९।। लाभली अश्वास सद्गती। हे पाहून देव बहु हर्षती। माकुटतीर्थास अश्वतीर्थ नाम देती। स्थापिती तेथे अश्वेश्वरास।।९०।। आले विशालतीर्थी अगस्ती। आपल्या सतीस ते सांगती। कोल्हासुरा पुत्र विशाल जिंकी। इंद्रादि सकल सुरांसी।।९१।। तेंव्हा विष्णु आणि सुरवर। आले विशाळ दैत्याणासी सत्त्वर। करी विष्णु मुष्टीप्रहार। विशाळ दैत्य पडला उताणा।।९२।। त्याचे हस्त, पाद, शिरावर। वृषण पार्श्व जे त्यावर। राहिले उभे ब्रह्मादि सुरवर। दैत्य न उठावा म्हणोनी।।९३।। नंतर दैत्यासी म्हणती देव। घे रे मागुनी इच्छीत वर। म्हणे मम देही असो उत्तम तीर्थ। करावा तुम्ही येथेच वास।।९४।। पौष अमावस्येचे दिवशी। या विष्णुक्षेत्री माझे वधासी। तुम्ही आलात म्हणून जनांसी। या अमावस्येस लाभो सद्गती।।९५।। देती

त्यास लक्ष्मी स्वयंपाकघर। मग भोगावती जी पातालस्थित। आली ती हटकेश्वरासहीत। आली असे जगा तारावया।।९६।। नारद म्हणे विशाल तीर्थाख्यान। ऐसे लोपामुद्रेसी सांगोन। तेथे स्नान, हिरण्याश्राद्ध तर्पण। पिंडदान, गोदान, करी अगस्ती।।९७।। विशाळ तीर्थी विधीपूर्वक। जे जे कर्म करतील लोक। ते होतसे गयेहून अधिक। सांगे नारद मार्कण्डेयासी।।९८।। पुढे अर्ध कोस अंतरावरी। त्र्यंबकेशाचे तीर्थावरी। स्नान करून नमस्कारी। त्र्यंबकेश्वरास मुनी अगस्ती।।९९।। तेथे साठ बाणांतरी ब्रह्मतीर्थ। तेथील विधी करोनी त्वरित। जी त्रिस्थली पंचक्रोशांवर स्थित। ती करण्यास्तव मुनी परत आला।।१००।।

**श्री महालक्ष्मी चरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।**

सहावा अध्याय

# ।। संततीलक्ष्मी अध्याय ।।

**श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।**
**श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री महालक्ष्मी नमः। श्री ग्रामदेवताय नमः।**

श्री लक्ष्मी प्रत्यक्ष विष्णुरूप। करिती ध्यान तुझे भक्त। पूजने, दर्शने होती विमुक्त। पावुनी भुक्ती सकल ते।।१।। नारद सांगती मार्कण्डेयासी। क्षेत्र महिमा वर्णिती अगस्ती। सांगतो मी ते तुजसी। ऐक बा मार्कण्डेया।।२।। त्र्यंबकेश येथे करी वास। गौतमी पंचनंदी करून स्नान। जे जन पाहती त्र्यंबकेश्वरास। पावती ते परम गती।।३।। करून उमात्र्यंबकेश्वराचे पूजन। आले अगस्ती लिंगतीर्था लागोन। येथे नाहोनी लिंगेशाचे दर्शन। घेता सर्व लिंग फळ लाभे।।४।। होती शिवभक्त गुणवती नारी। महालक्ष्मी दर्शन नित्य करी। या क्षेत्री लिंगे तीळतीळावरी। सर्व लिंगांची ती पूजा करी।।५।। लिंगदर्शनावीण न सेवी अन्न। आले तिजसी वृद्धपण। झाली पीडित ज्वरे करून। मार्गे झाली ती पतीत।।६।। तिने अन्नपान त्यागिले। प्राण तियेचे कंठासी आले। शिवगण शिवाज्ञे तेथे आले। शिवलोकी नेण्या तिजसी।।७।। ती म्हणे कृपाळ तुम्ही शिवगण। न करावे माझे व्रतभंजन। कृपया सर्वलिंगे मज दावून। मगची न्यावे शिवलोकासी।।८।। आणीती ते लिंगतीर्थी तिज। त्या तीर्थामध्ये स्नान करून। लिंगेश्वराचे करून पूजन। सर्वलिंगाचे फळ तिज लाभले।।९।। मग फाल्गुतीर्थी तर्पण। स्व-पितरांचे यथाविधी करून। नंतर प्रेततीर्थी स्नान करून।

प्रेतशिळे समीप मुनी गेले।।१०।। प्रेतशिळेवरी करिता पिंडदान। प्रेताची अधोगती नाशन। जी करी न लागता क्षण। ती ही प्रेतशिला असे।।११।। मुनी सांगती भगिरथ कथा। कपिलशापे त्याचे पूर्वज सगर। झाले प्रेत साठ हजार। प्रेतत्त्वापासून तो मुक्त करी।।१२।। पुसतसे तो मुनिवंरासी। ते म्हणती तू दैववान असशी। पुत्रांमध्ये तू श्रेष्ठ असशी। म्हणूनी पितरमुक्ती इच्छिसी।।१३।। स्वपितृ मुक्तीस्तव जा करवीरासी। तेथे गयेच्या उत्तरेसी। सिद्धेश्वरक्षेत्राच्या दक्षिणदिशी। योजन अंतरावर प्रेतशिळा असे।।१४।। तेथे फोडोनी जळे भरल्या कुंभाला। करी यथाविधी सपिंड श्राद्धाला। करोनी येकेचिदिति मंत्रे श्राद्धाते। तीळमित्र सक्तुपिष्ट ऊर्ध्व टाकावे।।१५।। मग श्राद्ध करोनी रुद्रगयेंत। दुग्धादिके करी पितर तृप्त। मग सप्तकुलोद्धार तीर्थास। त्वरित जा तू भगिरथा।।१६।। तेथे स्नान सपिंडश्राद्ध कर। उद्धरतील तेणे तुझे पितर। येथे हा विधी करील जो नर। तो आपणासह सप्तकुळें उद्धरी।।१७।। येथे करोनी यथोक्त विधीला। करी मुक्त तो आपल्या पितरांना। जेथे सगरगण मुक्त झाला। ती ही असे प्रेतशिळा।।१८।। तेथे करोनी श्राद्धविधी। दुसरे दिनी गेले धर्मतीर्थी। जाऊनी तेथे धर्मारण्याप्रती। करी धर्मयज्ञ अगस्ती मुनी।।१९।। तिसरे दिनी ब्रह्म सरोवरी। जाऊनी मुनी स्नानादि करी। श्राद्ध करोनी यमतीर्थी स्नान करी। यमाश्वानकालास बली तो देतसे।।२०।। फाल्गुतीर्थी चवथे दिवसी। नाहून करी दानादि क्रियेसी। गयाशिरी श्राद्ध करावयासी। नमितसे रुद्रेश्वर गदाधराला।।२१।। जेथे असुर पिता आणि पुत्र। कोल्हासुर आणि करवीर। त्याते जेथे रुद्रादिक सुर। वधिती ती ही रुद्रगया।।२२।। तेंव्हापासून हे पवित्रक्षेत्र। कोल्हापुर आणि करवीर। ऐसी नामें पावे ते सुंदर। ऐकोनी विचारी लोपामुद्रा।।२३।। या दोघा दैत्यांची

नावें। स्वामी हे क्षेत्र कैसे पावे। दोघांच्या वधाने ऐसे म्हणावे। तर मग गया नाम कैसे।।२४।। ऐकोन तियेचे ऐसे प्रश्न दोन। मुनी म्हणे विष्णुनाभीतून। ब्रह्म होय तो प्रजा उत्पन्न। करितसे विष्णुच्या आज्ञेने।।२५।। सत्त्वगुणें देव उत्पन्न करून। तमोगुणें मानसपुत्र तीन। गया, लवण, कोल्ह म्हणोन। दैत्य उत्पन्न करितसे।।२६।। ज्येष्ठ गया आराधी विधीला। लोकहितार्थ मागे कराल। शुद्धी असावी मम देहाला। देव, पितर तीर्थांहून।।२७।। तैसे वरदान देई विधी। मग गय स्वस्पर्शे सुधी। पापीही तारीतसे निरवधी। तेंव्हा यम सांगे विधीसी।।२८।। मग विधी, विष्णु महेश्वर। युक्तीचा ते करून विचार। गया सुरापाशी सत्त्वर। येऊन तिघे उभे राहिले।।२९।। देव म्हणती गयासुरासी। असे मागणे तुजपाशी। जरी देतो ऐसे वचन देसी। तरीच मागतो गयासुरा।।३०।। गयासुर वचन देई तयांसी। तेंव्हा देव म्हणती असुरासी। यज्ञ करण्या ठाव आम्हासी। देई गय तुझे देहात।।३१।। मग संतोष मुनि अन् देवता। गयासुरासी घालून पालथा। त्याच्या पाठीवर तत्त्वता। करिती यज्ञ ते समयी।।३२।। देव म्हणती मग गयासुरासी। सांग इच्छा काय मानसी। ऐकोनी गयासुर बोले तयांसी। मागणे एकची असे माझे।।३३।। म्हणे जोवर चंद्र, भास्कर। तोपर्यंत तुम्ही सुरवर। जैसे आला असा मम देहावर। तैसेची तुम्ही सदा रहावे।।३४।। ते ऐकोनी सर्व सुरवर। म्हणती तथास्तु सत्त्वर। एथे श्राद्ध करिती ते सपितर। सत्यलोका जातील।।३५।। गयासुराचे बंधू दोघेजण। लवण आणि कोल्ह म्हणून। क्रोधें धावले ते देवांवर। भये देव कापती थरथरा।।३६।। गयासुर म्हणे बंधुसी। देवांनी करुनी याचना मजसी। पाडीले मज त्यांनी जमिनीसी। झाले भिक्षुक देवगण।।३७।। हे देव याचक असती। ते पराक्रमी सहसा नसती। करावा विरोध बळवंती। फक्त बळवाना

समागमें।।३८।। माझ्या ऋणापासून। झाला मुक्त तुम्ही दोघेजण। माझी प्रीती मनी धरुन। मांडू इच्छिता रणदेवांसी ।।३९।। आता असुरभाव टाकून। हरीचे करा रे तुम्ही सेवन। माझ्या देहाते स्पर्श करुन। पवित्र व्हा भ्राते हो।।४०।। बंधु वचन ऐकोनी। दोघे गेले निजस्थानी। सुखे जाती परी लवणमनी। दुःखाचे शल्य होतेची।।४१।। तो कदाचित नारदोपदेश। होतच करी द्विजद्वेष। मग ससैन्य जिंकोनी देवांस। त्र्यैलोक्याचे तो राज्य करी।।४२।। रुद्रादि देव गेले विष्णुस शरण। म्हणती गयाचा भ्राता लवण। आम्हास जिंकोन करी अपमान। वधावे तयासी आपण।।४३।। तेंव्हा विष्णु देवांसह येऊन। करी लवणासुरासी रण। परी तयासी म्हणे लवण। तव दर्शनेची झालो मी पूर्णकाम।।४४।। जेथे तवहस्ते पावेन मरण। ते क्षेत्र तव अन् गयाचे नामे करुन। तीर्थ पवित्र तेथे व्हावे जाण। झाला हर्षित विष्णु मनी।।४५।। मग तेथे विष्णु करी तीर्थ। विष्णुगया असे त्याचे नाम। अद्यापिही असे ते तीर्थ। विरज नामें ते प्रख्यात असे।।४६।। विष्णुने ऐसा मारीला लवण। झाला कोल्ह आरक्त नयन। अतिक्रोधे ओठ चावून। म्हणे देवांचे राज्य मी हरीन।।४७।। मी ऐसे उग्र तप करीन। जेणे सिध्द पावेल इच्छा मम। मग या देवांसी मी निर्दाळीन। रुद्र, सुरेंद्रादि समवेत।।४८।। तो कोल्हासुर कोल्ह गिरीवरी। जितप्राण, जितेंद्रिय,निराहारी। पादांगुष्ठे भूमी धरी। करीतसे तो उग्रतप।।४९।। गेला असता तो तपास। सुकेशी नाम ख्यात राक्षस। पुत्र हेति, प्रहेति सहीत। जाहला तो तेथे स्थित।।५०।। करीतसे तो धर्माचे खंडण। देवालयें तीर्थगण मोडून। गाई, ब्राह्मणांसी करी पीडण। जाहली प्रजा उद्विग्न।।५१।। सारी प्रजा, मुनी, देवगण। गेले सारे ब्रह्मासी शरण। नमन करुनी करिती कथन। सुकेशीची बहु दुष्कृत्ये।।५२।। तेंव्हा सुरवर सैन्यासह। निघाला विधी युद्धास्तव।

तितक्यात कोल्ह तपाचा अनळ। करितसे समस्ता व्याकूळ।।५३।। म्हणे ब्रह्मा भिऊ नका। याचा हेतू कल्ला ऐका। कोल्हा जिंकाया सर्वलोका। आमच्या द्वेषे करितसे तप।।५४।। विधी म्हणे प्रकट होवोन। झालोसे मी अतिप्रसन्न। द्यावया तुजसी वरदान। धन्य असशी तू कोल्हासुरा।।५५।। ऐसे कोल्हासुरास बोलोन। देह त्याचा पिप्पिलिका भक्षित। ब्रह्मा निर्माण करी प्रोक्षून। स्वकमंडलू जलाने।।५६।। मग तो कोल्हासुर दानव। विधीचे स्तवन करोन। ब्रह्मासी विनम्रत्वे नमून। मागतसे तो वरदान।।५७।। म्हणे तू, विष्णु आणि शंकर। तुवा केले जे सुरासुर। तयांपासून मी अमर। असावे सदा ब्रह्मदेवा।।५८।। देई मज राज्य पृथ्वीत। आणि वज्रासम जरा रहीत। शस्त्रास्त्रादिंनी अक्षत। असावा माझा देह सदा।।५९।। म्हणे ब्रह्मा मी देतो वर। जर सोडोनी गोद्विजदेव द्वेष। होसील जरी हरिचरणी रत। तरीच वर होईल सिद्ध।।६०।। आता जा तू दक्षिण काशीसी। तेथे राक्षस असे सुकेशी। सैन्यासह वधोनी त्यासी। सुखे राज्य करी तेथे।।६१।। मेळवूनी दैत्य सकल। दक्षिण काशीस आला कोल्ह। हेति प्रहेति सुत युक्त। रण सुकेशी करितसे।।६२।। कोल्हासुराचे शंभर पुत्र। करिती राक्षस सैन्याचा पात। ते पाहून सुकेशीचे सुत। कोल्हाच्या शत सुता मारीती।।६३।। स्वपुत्र वधिले ऐकोन कोल्ह। हेति प्रहेति जे सुकेशीनंदन। दोघेही कोल्हासुरे वधिले मग। सुकेशी संतप्त जाहला।।६४।। धावला तो कोल्हासुरावरी। तोच कोल्हासुर झडकरी। सुकेशीस धरुनी करी। उडवी सुकेशीचे शिर।।६५।। सर्व प्रजा अन् मुनीगण। करिती कोल्हासुरास राज्याभिषेक। मग करवीर क्षेत्री निष्कंटक। करितसे तो सुखे राज्य।।६६।। करवीर क्षेत्री राहे या रीतीने। पुत्रार्थी तो मुनींच्या वचने। महालक्ष्मीसी सेवून भक्तीने। चार पुत्र पावला कोल्हासुर।।६७।। करवीर विशाळ नामक। लज्जासुर

आणि कुलांधक। ऐसे कोल्हाचे चार पुत्र। त्यांचे संस्कार तो करितसे।।६८।। मग ज्येष्ठ पुत्र करवीर। स्थापुनी त्यासी राज्यावर। वनी जावोनी कोल्हासुर। मुक्तीस्तव तप करितसे।।६९।। आपले पितृव्य देवांनी। गय, लवण मारीले रणीं। करवीर हे वृत्त ऐकोनी। शोके संतप्त जाहला।।७०।। मग तो तीर्थे देवालये नाशी। पीडी स्वधर्मरत विप्रांसी। मोडून टाकी यज्ञादिकासी। उन्मत्त तो करवीर।।७१।। मग सुरमुनिवरांचा मेळा। गेले शरण ते विधीला। विधी शरण गेला शिवाला। समस्त आले विष्णुकडे।।७२।। मग विधी, हरि, हर निघोनी। आले अविमुक्त त्या स्थानी। ते युद्धास आले हे पाहोनी। सैन्यासह करवीर निघे।।७३।। विधीने वधिला लज्जासुर। हरीने विशाळ नामा क्रूर। इंद्रे वधिला कुलांधक सत्त्वर। पाहोनी करवीर खवळला।।७४।। शिवगण आले युद्धासी। करवीर तोडी त्यांचे आयुधांसी। मग त्या सर्वांच्या हृदयी। करी वेध तो आयुधाने।।७५।। दैत्य हृदयी रुद्र मारी शूळ। तेणे दैत्य झाला व्याकूळ। मरो लागे तेंव्हा रुद्र दयाळ। करवीरासी बोलतसे।।७६।। म्हणे तयासी माग वरदान। म्हणे तो मी झालो पावन। पूर्णकाम मुक्त मज नको अन्य। परि एकची मागणे असे।।७७।। सूर्य, चंद्र असती जो वरी। माझे नामे हे क्षेत्र तोवरी। असावे प्रसिद्ध पृथ्वीवरी। हेचि मागणे शंकरा।।७८।। शिवाने शूळे तोडीले शिरास। ते पडें अग्निकुंडाच्या दक्षिणेस। तेथे करवीर नामें सुंदर। महातीर्थ झाले असे।।७९।। देवांनी वधिला करवीर। ऐकोनी संतापला कोल्हासूर। म्हणे हे देव करुनी कपट। महालक्ष्मी बळे दैत्य वधिती।।८०।। आता मी तप करोनी। लक्ष्मीस आधी जिंकोनी। मग जिंकीन देवांसी रणी। म्हणून तो तप करी प्रखर।।८१।। होऊनी जितेंद्रीय करी तप। निराहार, निर्जल, निश्चल। ऐसे करी तो प्रखर तप। आली महालक्ष्मी वर देण्या।।८२।।

म्हणे तुझ्या तपे मी प्रसन्न। मागुनी घे तू वरदान। मग महालक्ष्मीस करुनी नमन। वर तो मागून घेतसे।।८३।। म्हणे महालक्ष्मीस तो असुर। तुवा येथोनी जावे शत संवत्सर। मी जिंकावे सकल सुर। ऐसे दोन वर देई मजसी।।८४।। लक्ष्मी गुंतली वचनासी। गेली निघून हिमालयासी। क्षेत्र वियोग परि होई तिजसी। जाहली ती बहु कृश।।८५।। विष्णु, ब्रह्मा, शिवादि की। वधिले त्यांनी मम बंधुंसी। म्हणून शूळ घातें वधीन त्यांसी। होतील सुरगण निर्बल।।८६।। प्रजा, ब्रह्मा, विष्णु देव सर्व। आले सकल शिवसन्निध। तया सर्वा घेऊनी सदाशिव। महालक्ष्मी प्रती गेला।।८७।। ऐकून लक्ष्मी नवकोटी सखीयुक्त। निघाली कोल्हासुर वधास। चामुंडगण मंडीत ती। आली प्रथम कऱ्हाडक्षेत्री।।८८।। वधिला दुरीत, कोल्हाचा शाल। आली ऐलाख्य गिरीवर। वधिला तेथे देविलनामा असुर। ऐलजा नामे प्रसिद्ध झाली।।८९।। क्षेत्रमार्ग निरोधाया कोल्हे। महिषासुरास होते थापिले। सभोवार दैत्यगण त्याने ठेविले। तयांसी साऱ्यांसी देवीने वधिले।।९०।। ते पाहोनी इंद्रादि अमर। वज्रदिकें वधिती दैत्य प्रखर। ते विलोकून कोल्हासुर। सेनेसह युद्धासी आला।।९१।। तो देवांची शस्त्रास्त्रे गिळी। मग रुद्र निजास्त्रे त्यास वोढोनी। नदीजळी पाडून उरी पाय देई। विधी हरि देती पाय त्याचे उरी।।९२।। मग महालक्ष्मी, महातेजा। होऊनी अष्टादश भुजा। कमंडलू, पानापात्रादि आयुधांचा पुंजा। हस्ति धरुनी सिंहावरी बैसे।।९३।। हर म्हणे मग कोल्हासुरासी। आम्हासी धरिले तू शरीरावरती। खरेची अतुल्या बळी तू असशी। घेई मागून तू वरदान।।९४।। मजला श्रीहस्ते यावे मरण। लक्ष्मीस घातले बाहेर क्षेत्रातून। म्हणती मजवर ती कोपली जाण। ती मज मुक्ती दे ऐसे कर।।९५।। हे क्षेत्र व्हावे कोल्हापुर संज्ञक। छेदावे येथे कुष्मांड फळ। ते एकून देवीच तथास्तु म्हणोन।

शिर तयाचे तोडीतसे।।९६।। ब्रह्मादिकीं स्तविली लक्ष्मी। अमृत वाहिनी नदी ती आणी। देवांसी जळे जीवंत करी। म्हणूनी जीवंती नाम ठेविले तिचे।।९७।। अष्टादशभुजा गयेच्या दक्षिणेसी। देव तिथे लक्ष्मीतीर्थ करती। गयेच्या पूर्वेस फल्गुसमिपी। असे विष्णु गदाधर रुप।।९८।। आपुली महालिंगे चतुर्दश। स्वये स्थापन करुनी रुद्रेश। करवीर क्षेत्री करितसे वास। कोल्हासुराच्या भक्तीने।।९९।। गयेच्या दक्षिणेस रामगया रामतीर्थ। रामतीर्था पुढे सीतातीर्थ। वालुकापिंड सीता हस्तगत पावून। राजा दशरथ जाहला मुक्त।।१००।।

**श्री महालक्ष्मी चरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।**

सातवा अध्याय

# ।। धनलक्ष्मी अध्याय ।।

**श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।**
**श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री महालक्ष्मी नमः। श्री ग्रामदेवताय नमः।**

स्वामी समर्था गुरुवर्या। केले लिहिते तुम्हीच मजला। करावी ही नवशती पूर्ण आता। देवोनी मजसी वरदाने।।१।। अगस्ती सांगती दानदिंचा काळ। तैसेची पिंडदानाचा काळ। ऐकोनी मनोवाक्कयज मळ। जावोनी पुण्य घडे सर्वांसी।।२।। दुष्ट कोल्हासुराचा वध करोनी। देवी अष्टादशभुजा धरोनी। राहील आनंदे लक्ष्मी तीर्थी। समस्त नारदादि करिती सेवा।।३।। तिच चतुर्भुजे करोनी वास। राही मनकर्णिकेच्या दक्षिणेस। कल्पतरू युक्त हे करवीर। स्तविती देवगण सिंहासनस्थ लक्ष्मीसी।।४।। कोल्हे बंदी घातलेले सुर। नारी, राजकन्या, नाग, किन्नर। श्रीने तया सोडीवले सत्त्वर। राजकन्या देवीसी स्तविती।।५।। तव कृपेने गेल्या विपत्ती। मंगलप्रद तू देवी भगवती। ज्यांच्या मनी तव भक्ती। लाभे तयांसी सकल सिद्धी।।६।। देई तव दास्यत्व गे आम्हासी। ऐसी ऐकोनी स्व-स्तुती। म्हणे मग ती राजकन्यांसी। व्हावे तुम्ही योगिनी।।७।। ठेविते मी विविध नामांते। करा ग्रहण तुम्ही त्याते। त्याने देवी म्हणोनी ऐसे। देतसे वेगवेगळी नामें।।८।। दिव्ययोगी, महायोगी, सिद्धयोगी। नरेश्वरी, प्रेताशी, शाकिनी। कालरात्री, निशाचरा आठवी। टंकाली, रुद्रावेताली, हुंकारी।।९।। भुवनेश्वरी, ऊर्ध्वकेशी

विशालाक्षी। शुष्कांगी, रक्तभोजी सोळावी। बव्हाकारी, वीरभद्रा, धूम्राक्षी। कलहप्रिया, राक्षसी, घोररक्ताक्षी।।१०।। विश्वरुपा, भयंकती चोविसावी। वीर कौमारी, चामुंडा, वाराही। मदनारुपी, भासुरी, रौद्रवेताळी। भीषणी, त्रिपुरांतका बत्तिसावी।।११।। भारवी, धन्विनी, क्रोधी। दुर्मुखी, प्रेतवाहिनी, कालाग्नी। ग्रहणी, चक्रा चाळीसावी। चक्री, कंकाली, भुवनाधिया।।१२।। कंटकी, ताटकी, मानिनी। यमदूती, कसलिनी, असिनी। मूर्धनी, यक्षिणी एक्कावन्नावी। रोमजंघा, अपहारिणी, लक्ष्मी।।१३।। कार्मुकी, लोला, हेमसखी। कालदृष्टी आणि अधोमुखी। धूर्माक्षी, विमला साठावी। घोरा, कपाली विषमा, अग्निनी।।१४।। 'व्हा' अशा चवसष्ट योगिनी। पावाल प्रसिद्धी माझ्या वरांनी। पावतील कामना इहपरलोकी। नामोच्चारे करिता तुमची पूजा।।१५।। श्रीच्या आधी यांसी पूजिती। विशेषतः नवरात्रीत पूजिती। श्रीस्तुतीने झाली योगिनींस प्राप्ती। सिद्ध चारणदित्यादि श्रीस स्तविती।।१६।। जगंदबे शत्रुपासूनी त्रैलौक्य रक्षिसी। विश्वाश्रया विश्वी तू राहसी। विश्वेश्वरी विश्वाते करिसी। भक्त होती विश्वाश्रय।।१७।। जेव्हा महासंकटे प्राप्त होती। तेंव्हा देव, विप्र आणि मुनींसी। माते तूचि भयापासून रक्षिसी। सर्वांची त्राती तूच माते।।१८।। विष्णुकर्ण मळातून मधु, कैटभ झाले। तया हरि करवी तू वधविले। महाबळी महिषासुरास तू वधिले। धूम्रलोचनास हुंकारे केले भस्म।।१९।। वधिलेस तू चंड मुंड असुर। वधिलास तूचि रक्तबीज। शुंभनिशुंभासी मारीलेस। गयासुरास मायेने मोहविलेस।।२०।। तव मायेने विष्णु मारी लवणासुर। तूंचि टाचेने मारीला सत्त्वर। देवाही अजिंक्य कोल्हासुर। देव भक्तादिंच्या रक्षणासाठी।।२१।। याप्रकारे करुनी स्तवन। नाना उपचारे देवीस पुजून। केले सर्वांनी लक्ष्मीस प्रसन्न।

लक्ष्मी तयांसी देई वरदान।।२२।। म्हणे या स्तवने करिता स्तुतीस। नाशीन मी त्यांच्या सर्व बाधेस। चतुर्दशी, अष्टमी, नवमीस। जे विशेषे हे स्तवन पठिती।।२३।। न येईल तयासी दरिद्रपण। नसे भय राजा, चोर, शत्रुंपासून। युद्ध, अग्नी, भूतप्रेतादिपासून। नसेल भय तयांसी कदा।।२४।। कोल्हासुराच्या नामे करून। प्रतिवर्षी कुष्मांडभेदन। करिता होईल सर्वारिष्ट नाशन। भूत तृप्तीही होईलची।।२५।। सकलदेव कात्यायनी। चामुंडा आणि योगिनी। त्यासर्वांसह देवी मिळोनी। प्रतिवर्षी कूष्मांड भेदी।।२६।। मुक्ती मंडपी प्रतिवर्षी। कूष्मांड भेदी त्र्यंबुली पाशी। कालवधार्थ नवरात्री पंचमीसी। शांती करुनी श्री जगरक्षी।।२७।। त्र्यंबुली कोण, सांगतो तुम्हासी। कौडिण्यऋषी सत्यवती पत्नी। होती पतिव्रता सद्‌गुणी नारी। नित्य पतिसेवा ती करितसे।।२८।। एके दिनी करी ती पाद सेवा। घृत लावून करीत होती मर्दन। तेणे ऋषी जाहले निद्रिस्त। तेंव्हाच एक भिक्षुक आला।।२९।। गेली सत्यवती भिक्षा द्यायला। तेंव्हाच ऋषी जागा झाला। सेवा सोडून गेलीस भिक्षा देण्या। यास्तव तू होशील दासी।।३०।। झाली आश्चर्य चकीत सत्यवती। म्हणे दारी येता अतिथी। तुमच्यास्तव मी पूजा केली। यात अपराध असे कोणता।।३१।। मग म्हणती ऋषी। उगाच शापीले मी तुजसी। द्वीजवंशी जन्मोन श्रींची दासी। होऊन देवांवर उपकार करशील।।३२।। भार्गव नामे एक द्विज होता। विशालाक्षी नामें त्याची कांता। प्रतिवर्षी होतसे तिज कन्या। पंचमदिनी ती मृत्यु पावतसे।।३३।। मग ते दोघे संकल्प करती। जरी वाचेल एक कन्या तरी। अर्पू तिज श्रीच्या चरणी। संकल्प करता झाली गर्भवासी।।३४।। प्रसवली ती सातवे मासी। चतुर्भुज कन्या आली उदरी। देवीचा नवस पूर्ण करण्यासी। पिता कन्येस घेऊन निघाला।।३५।। पत्नी मग विनवी पतीसी। अर्पावी कन्या

दशदिनांतरी। नंतर निघला पती। बहु आक्रोश ती करी।।३६।। मग कन्या म्हणे तिजसी। जरी तू सत्य वर्तसील। तरी तुज पाच पुत्र होतील। असे सत्य माझे वचन।।३७।। ऐक आई तू असता संकटी। स्मरण करी ग मजसी। येऊन नाशीन संकटासी। जाऊं दे मज देवकार्यास्तव।।३८।। भार्गव निघे घेऊन कन्येला। आला तैसाची कोल्हापुराला। अर्पिली कन्या त्याने श्रीला। पावतसे तो बहु वरदान।।३९।। मग श्रीचे आज्ञे यात्रा करून। द्विज आला स्वपुरी परतून। धन, धान्य, संपत्ती, संतती। पावोन तो जाहला सुखी।।४०।। इकडे कन्या झाली मोठी। त्रिकाल श्रीपूजन ती करी। सडासंमार्जन करुन देवालयी। अहोरात्र श्रीचे दास्य करितसे।।४१।। असे तेथे मल्लालय नाम तीर्थ। सुगंधी हेमकमले होती त्यात। चोरुनी पाताळी नेती दैत्य। लक्ष्मीने कन्येस ठेविले रक्षणार्थ।।४२।। गगनपंथे येताची दैत्य। चतुर्भुजी कन्या करी त्यांचा वध। म्हणून पाताळ विवर करोन। नेती कमले गुप्तरुपे।।४३।। मग कुमारी ते जाणोन। त्रिकाल उदकी बुडोन। मारीतसे ती दैत्यगण। जे येती कमळ नेण्यासाठी।।४४।। कृपायुक्त लक्ष्मी म्हणाली। अंबुमध्ये बुडालीस त्रिकाळी। यास्तव तुझे नाव त्र्यंबुली। होशील प्रख्यात तू भूतली।।४५।। वधुनी गुप्तरूपे येणारे असुर। केलेस निर्भय अब्जनिकर। यास्तव जिंकोनी दैत्य प्रखर। माझी कार्यकर्ती तू होय।।४६।। प्रसन्न होवोन मग त्र्यंबुली। श्रीसेवेस तप्तर जाहली। जी देवादिका हस्तेही न घडली। ऐसी कार्ये ती करितसे।।४७।। विष्णुबळें दैत्य जिंकीले सुरीं। किती जाती पाताळ विवरी। किती लंकेत, किती सागरी। गिरीदुर्गीही राहती दैत्य।।४८।। कोल्हासुर वधिला त्या समयी। होती गर्भिणी त्याची नारी। ती कराळी नाम स्वकन्येचे घरी। पाताळी जावोनी राहिली।।४९।। तेथे प्रसवली ती पुत्रातें। कामाक्ष नाम दैत्य पुंगवाते। कन्येसी दत्तक देवून

त्याते। आपण अग्नी प्रवेशली।।५०।। त्र्यंबुली करी राक्षसांचा घात। कामाक्ष ऐकोन वर्तमान। क्रोधे आकाशमार्गे येऊन। पीडितसे तो सर्व भुवन।।५१।। मोडीतसे मुनि, देव भुवनें। हरि इंद्रादिलोकपाल स्थानें। एक कोल्हापुर क्षेत्राविणें। त्र्यैलोक्याचे राज्य तो करी।।५२।। कोल्हापुरास पळाले अमर। तयापाठी येवोन तो असुर। पाहे तो बुरुज खंदयुक्त करवीर। जलाशयी रुपे विष्णुरक्षी त्याते।।५३।। पाहुन असुर गर्जना करती। तेणे महालक्ष्मी बहु कोपली। चतुरंग बलाढ्य सेनेसह आली। देव, दानव युद्ध जाहले।।५४।। कल्पाब्धिसम दैत्य बळ। शक्त्यांसह देवी नाशी सकळ। पाहुनी कामाक्ष झाला विव्हळ। शेषदैत्य घेऊनी पळाला।।५५।। आला कामाक्ष शुक्रापासी। देव जिंकिण्या मार्ग पूसे त्यांसी। शुक्र म्हणती श्रीचे बळ देवांसी। त्यांना जिंकिण्या असे उपाय एक।।५६।। कपिले करोनी बहु तपाला। माझा योगदंड त्याने घेतला। उजवा फिरविता त्या दंडाला। देवमनुष्यादि होती शेळ्या, मेंढ्या।।५७।। जावे कामाक्षा तू कपिलाकडे। करुनी सेवा दंड मागुनी घे। मग फिरवूनी त्या दंडाते। देवांसी शेळ्या, मेंढ्या करी।।५८।। मग तुझी बहीण रक्ता तिज। मजकडे तू पाठव। मी देईन तुज वृकरूप। भक्षी शेळ्या, मेंढ्यारुपी अमर।।५९।। मग फिरवूनी त्या दंडाला। देईन मी तुझे रूप तुजला। ऐसे जिंकुनी सर्व देवांना। सुखे दैत्या तू राज्य कर।।६०।। गेला तो कपिलाश्रमात पाताळी। तयासह भगिनी रक्ता गेली। मग प्रसन्न करुनी कपिलासी। त्यांनी योगदंड प्राप्त केला।।६१।। कपिले सांगितले तयासी। जरी यास भूमिवर ठेविसी। होईल दंड निःसार तेंव्हाची। ऐकून कामाक्षाने त्यांची घेतली आज्ञा।।६२।। कुष्मांडभेदास्तव तेंव्हा त्र्यंबुली। ग्रामांतरातून चणकादि पाठवी। सर्व चणकादि दैत्यमार्गी लुटती। लक्ष्मीने मग पाठविला

दूत।।६३।। मग त्र्यंबुली ते गगनपंथे पाठवी। साहित्य पाहुनी देवदेवी हर्षती। कुष्मांडभेदास ते प्रारंभ करती। तेंव्हाची दैत्यगण युद्धासी आले।।६४।। कूष्मांडभेद सोडून देवगण। आले तेंव्हा सर्व युद्धास्तव। जाहले देवदैत्यांमध्ये तुंबळयुद्ध। कित्येक देव, दैत्य मृत पावले।।६५।। मग पाहुनी लक्ष्मी कामाक्षाते। गदेने ताडी, तो मूर्च्छापावे। परि पुन्हा उठोनी तो श्रीते। अयुत शस्त्रांनी झाकीतसे।।६६।। लक्ष्मी छेदी शस्त्रे बाणाने। तो शक्ती घेवोनी धावे वेगाने। त्याचे हृदय भेदी श्री त्रिशूलाने। तेंव्हा कामाक्ष गजरूप धरी।।६७।। कामाक्षासी मारावा म्हणून। वेढिती तयासी सर्व देवगण। तेंव्हा तो दैत्यरूप धारण करून। गगनी उड्डाण करतसे।।६८।। सर्वदेव एकत्र आले पाहून। कामाक्ष हाती दंड घेवोन। उजवा फिरवी तो देवांवरून। सर्व देव शेळ्या, मेंढ्या झाले।।६९।। सांगे कामाक्ष मग रक्तेसी। जावे तू आता शुक्रापासी। तेंव्हा रक्ता बोले तयासी। प्रथम दुग्धादि घेऊ पिऊन।।७०।। कामाक्ष रक्षी शेळ्या, मेंढ्याते। भक्षी बहुत वर्षे दुग्धाते। नारदे जावोनी कुबेर गृहाते। सांगितले वृत्त त्र्यंबुलीसी।।७१।। ते ऐकोनी ती दुःखित होय। स्व-स्वामी जो कुबेर तनय। मणिग्रीव त्याचे रगडीत होती पाय। त्याच्या पायावरी अश्रू पडले।।७२।। मणिग्रीव पूसे दुःखाचे कारण। शेळ्या, मेंढ्या करी कामाक्ष। श्री सर्वदेव शक्ती सहीत। तेणे जाहले मजसी दुःख।।७३।। मणिग्रीवाची आज्ञा घेवोन। निघाली त्र्यंबुली तेथोन। करीन काही उपाय म्हणून। करी निश्चय मानसी ती।।७४।। एके रात्री आज्ञा देई कामाक्ष। रक्ते जावोनी आण शुक्रास। मग दैत्यासह वृकरूपे शीघ्र। भक्षीन मी अजावी देवगण।।७५।। निघाली रक्ता शुक्राकडे जाण्या। मार्गी त्र्यंबुली अडवी तिला। म्हणे निघाली कोठे रात्रीला। रक्ता म्हणे जा तव स्थानाला।।७६।। रक्ता त्र्यंबुलीस मुष्टी मारी। त्र्यंबुली रक्तेस केशी

धरी। फिरवूनी आपटे पृथ्वीवरी। रक्त ओकून रक्ता मरण पावली।।७७।। त्र्यंबुली वृद्ध दासी होवोन। गगनमार्गे कामाक्षाकडे येवोन। मी असे शुक्राची दासी म्हणोन। सांगे शुक्रांचा असे निरोप ।।७८।। तवभगिनी रक्ता असे मजपाशी। येईन मी परवाचे दिवशी। रक्षावया अजस्र अग्नी। गोमयाच्या रानशेणी हव्या मज।।७९।। कामाक्ष मग म्हणे तिजसी। येथे अजावी वसती। परि गोमय रानशेणी नसती। हुडकून घेऊन जावे तू।।८०।। मग त्र्यंबुली हुडकी रानशेणी। भरी हारा दारुण पाषाणांनी। वरती ठेवून लाकडे, शेणी। उचलू लागे हारा ती।।८१।। म्हणे 'कामाक्षा', जरा मज पीडी। वारंवार भार खाली पाडी। देशील जरा हारा उचलोनी। होतील फार उपकार तुझे।।८२।। ऐकोनी तियेचे ऐसे वचन। झाला कामाक्ष माया मोहीत। शिरी मग योगदंड बांधून। दोन्ही हस्ते हारा उचलीतसे।।८३।। उचलता वरी हारा जड झाला। त्र्यंबुलीने दैत्याच्या उरी टाकीला। तेणे कामाक्ष बहु व्याकूळ झाला। त्र्यंबुली योगदंड घेई काढोन।।८४।। पाषाणयुक्त हारा त्याचे उरी। तव त्र्यंबुली आणोनी गिरी। टाकीला कामाक्षाच्या उरी। पादमूले मर्दने मारीले त्यासी।।८५।। आनंदे श्रीसह सर्व देवगण। निघाले त्र्यंबुलीस विसरोन। वार्षिक कूष्मांड भेदाकारण। झाली मग श्री आसनस्थ।।८६।। पाही श्री सारी देवमंडळी। न दिसे तिज त्यात त्र्यंबुली। मग म्हणे श्री सर्वदेवांसी। बोलावून आणा इथे तिजसी।।८७।। ऐकोनी आले शुक्रादि देवगण। त्र्यंबुली म्हणे तयांसी वचन। झाले तुम्हासी माझे विस्मरण। आता मी येणार नाही।।८८। ऐकोनी देवगण स्वस्थ राहती। शापभये ते श्रीकडे न जाती। मग आपणची त्वरित गती। स्वये लक्ष्मी तेथे आली।।८९।। आली श्री त्र्यंबुली प्रती। बहु प्रीतीने आलिंगी सती। मग हनुवटी धरोनी प्रार्थी। त्र्यंबुलीस महालक्ष्मी।।९०।। मजवरील कापे

सोडी सत्त्वर। तुजवीण सखी नसे इतर। तुजवाचून गेले होते क्षेत्र। त्वाची ते देवयुक्त केले।।९१।। यास्तव देते तुज वरदान। घे तुझे इच्छित ते मागोन। ऐकोनी ऐसे लक्ष्मीने वचन। लोकहितार्थ त्र्यंबुली वर मागे।।९२।। कूष्मांडभेद जो प्रतिसंवत्सरी। मुक्तीमंडपी करतीस ईश्वरी। तो करावा माझे द्वारी। अश्विन शुद्ध पंचमीस।।९३।। ते दिवशी तुजसहीत। देव येवोत यात्रार्थ। जे जे क्षेत्री असे तीर्थ। तेथे स्नानादि करतील जे।।९४।। तयांसी माझ्या दर्शनाविणें। स्नानादि फळ न येणें। ऐसे ऐकोनी श्री म्हणे। तथास्तु ऐसे तिजलागी।।९५।। त्वा देवदेवीत श्रेष्ठ व्हावे। जेणे येथे तीर्थादि करावें। तेणें आदि, मध्य, अंती घ्यावे। दर्शन तुझे निश्चये।।९६।। जो क्षेत्री तीर्थविधी करी। तो तुझे दर्शन न घे तरी। सकळ सुकृतांचे फळ सुंदरी। तुजसी प्राप्त होईल।।९७।। जो अशक्त नित्य दर्शनीं। अश्विन शुद्ध पंचमी दिनी। तो फक्त तुझी पूजा करोनी। क्षेत्रवास फळ पावेल।।९८।। क्षेत्रांतील जन चतुर्विध। त्यांनी येथे करावा कूष्मांडभेद। न केल्या ते विघ्नांचे वृंद। पावतील ते निःसंशय।।९९।। ऐसा वर त्र्यंबुलीसे देऊनी। तिज लक्ष्मी स्वये पुजूनी। ती पुढे कूष्मांड भेदोनी। आनंदे सर्वांसह करी गर्जना।।१००।।

**श्री महालक्ष्मी चरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।**

आठवा अध्याय

# ।। गजलक्ष्मी अध्याय ।।

**श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।**
**श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री महालक्ष्मी नमः। श्री ग्रामदेवताय नमः।**

जय जयकार तव महालक्ष्मी। श्रीविष्णुरूप तू स्वयं असशी। तैसेची त्याची परमशक्ती। करवीरी वसून रक्षिसी जगा।।१।। वधूनी दुष्ट दुर्मती दैत्यांसी। जगती तू सौख्य स्थापिसी। तुझे वर्णन करावयासी। देई मती लक्ष्मणसिंधु सुता।।२।। नाना वाद्यांचा गजर करोन। त्र्यंबुलीस स्वये पूजोन। महालक्ष्मी नंतर कूष्मांडभेदोन। सर्वदेवांसह गर्जे आनंदे।।३।। कूष्मांडभेदाच्या नंतर। सर्व मुनी आणि अमर। स्मरोनी त्र्यंबुलीचा उपकार। स्तवन तिचे ते करिती।।४।। अंजन, धूपदिपादी उपचार। हरिद्रा, कुंकुमादि ही फार। त्र्यंबुलीस अर्पोनी सुरवर। परमानंदे तिचे पूजन करिती।।५।। जाहली मग त्र्यंबुली प्रसन्न। राग विसरोन देई वचन। तुमच्या पूजास्तवनें करून। इच्छित तुमचे मी पुरवीन।।६।। या स्तवें करिता ममस्तवन। तयाची सर्व बाधा नाशीन। जो पुढे ऐकेल मम आख्यान। तयासी सर्व सिद्धी लाभेल।।७।। आश्विन शुद्ध पंचमीला। या स्तवनें स्तविता मजला। तो पावेल सर्व कामार्थाला। शतयुषीही तो होईल।।८।। नारद म्हणे गयासुराख्यान। अगस्ती पत्नीस सांगोन। रुद्रादि पदी पिंडदान। विधियुक्त सपत्नीक करी।।९।। नानाविधी नाना तीर्थांते। करोनी गेला त्र्यंबुली ते। कुंकुमांजन, चंदन, भक्ष्याते। तांबुल फलादि करी

समर्पण।।१०।। नंतर क्षेत्र पूर्वद्वाराची स्वामिनी। त्या उज्ज्वलांबेपासी जावोनी। उज्ज्वलतीर्थी तर्पण करोनी। नाना उपचारे तीस पूजितसे।।११।। लोपामुद्रेस सांगे मुनिवर। हे करवीर क्षेत्राचे पूर्वद्वार। यास रक्षी उज्ज्वलांबा उग्र। ती त्रिशूळे पर्वत भेदी।।१२।। तेंव्हा उज्ज्वल अमृतकुंडातून। पाझर निघे त्याते आवरण। क्षेत्रास करावया जाण। वारणा नदी केली असे।।१३।। हे तीर्थ ही देवी नारी। पाप्यासही उज्ज्वल करी। म्हणोनी म्हणती लोकांतरी। उज्ज्वलतीर्थ उज्ज्वलांबा।।१४।। एक शुद्र पंचमहापापी दुराचारी। मुनींनी पाठविला करवीरी। म्हणती कृष्णतीळ घेऊनी करी। ते शुभ्र होता जाईल तव पाप।।१५।। सर्वतीर्थानंतर या तीर्थी करी स्नान। घेई तो उज्ज्वलांबेचे दर्शन। तेंव्हा तीळ उज्ज्वल झाले म्हणोन। उज्ज्वल नामक हे तीर्थ झाले।।१६।। तीर्थे करीत मुनीश्वर। क्षेत्राचे आग्नेयेस दोन कोसावर। जिथे राहे गोकुळेश्वर। तयापासी येई मार्कंडेया।।१७।। त्र्यैलोक्यांतील तीर्थे सारी। तव प्रसाद्रे पाहिली सारी। ऐसे अगस्तीस बोले नारी। करवीरासम नसे अन्यक्षेत्र।।१८। दक्षिणकाशी हे करवीरक्षेत्र। मंगलात ते मंगलपर। पिठांतही महापीठ हे क्षेत्र। तीर्थकर्त्यास तीर्थ प्रकाशन करी।।१९।। मुनीवदे क्षेत्राच्या एकदेशी वसे। ते गोकुळक्षेत्र महात्म्य वर्णु कैसे। नानातीर्थयुक्त क्षेत्र हे। असे मी स्वल्पायुषी।।२०।। परि सांगतो गोकुळ क्षेत्र कथेसी। सोडोनी कृष्ण द्वारावती। आला स्वकर्माची निष्कृती। करावया स्वमंडळी युक्त।।२१।। देवकी वसुदेव श्रीकृष्णास। प्रार्थिती बाललीला करावयास। तेंव्हा येथे करी तो गोकुळास। यमुनाही आणि येथे प्रिये।।२२।। जे दर्शनमात्रे हरि पापाते। गोकुळेश्वर नाम देई त्याते। देतसे कृष्ण नाना वराते। लोकहितार्थ लिंगासी।।२३।। करवीरी अन् स्थळांत। जी लिंगे असती अनंत। ती अष्टमीस श्रावण वद्यात। गोकुळेश्वर दर्शना

येती।।२४।। म्हणे अगस्ती सत्यची वदसी। नसे ग पापलेश श्रीकृष्णासी। परि करावया लोकशिक्षेसी। देह धरोनी निष्कृती करी।।२५।। सारे काही सर्वगुणसंपन्न। स्वर्गांत तैसे नसती जाण तेंव्हा नारदाचे आगमन। कदाचित झाले द्वारकेसी।।२६।। तयाचे हस्ति असे वीणा। कटीस तयाचे मौंजी मेखला। वक्षस्थळी शोभे तुळसीमाला। परि तपें सर्वांगी कृश झाला।।२७।। नारदास करिती सर्व नमन। परि सांब स्वरूप गर्वे करून। नारदाचे मुनिवेषाते हासोन। न करी नमन तयासी।।२८।। नारदास मधुपर्कादिके पुजून। विश्रांत झाल्यावरी श्रीकृष्ण। पादमर्दन करिता कुशलप्रश्न। स्वस्थपणें करी श्रीकृष्ण।।२९।। कृष्णा तुझे नामस्मरण। करी शुद्ध पापी जन। लोक असे करोन म्हणून। माझे पूजन तू करिसी।।३०।। करोनी मग श्रीकृष्णस्तुती। नारद तो ब्रह्मचारी। हळूहळू कृष्णास सांगे की। सांबाचे वर्म अलगद।।३१।। कृष्णा एक मी सांगतो तुजसी। तुझा पुत्र सांब रुपवान अती। स्त्री मन मुळात असे चंचलची। काय बरे मी सांगावे तुज।।३२।। कृष्णा गोपींकाचे जे आचरण। त्याचे नसे का तुज स्मरण। तुझ्या अष्टनामक मात्र सोडून। सर्व स्त्रिया सांबाते इच्छिती।।३३।। मग कृष्ण तो दामोदर। सांबाचे पाप पाहे अहोरात्र। परि न दिसे दुष्ट चरित्र। श्रीकृष्णास सांबाचे।।३४।। ऐसाच काही काळ गेला। तेंव्हा त्या द्वारावती नगरीला। नारदमुनी पुन्हा आला। श्रीकृष्णाकडे दर्शनास्तव।।३५।। तेंव्हा स्त्रियांमध्ये श्रीकृष्ण। बैसला हे मुनीने पाहून। सांबास सांगे तू जावोन। सांग माझे आगमनासी।।३६।। स्त्रियांसह एकांती कृष्ण बसे। तयापासी मी जावे कैसे। न जावे तर मुनिशापभय असे। बरवा शाप पित्याचा।।३७।। स्त्रियांत बैसला श्रीपती। पाहोनी दुरुनी करी नती। नारद आला ऐसी विनंती। सलज्ज सांब करितसे।।३८।। इतुक्यामध्यें तो नारद। करण्या आपुले

कार्य सिद्ध। आत जाई तो उठे मुकुंद। करी स्वागत नारदमुनींचे।।३९।। मग उठोनी सर्व अंगना। करती वंदन नारदांना। मुनीस हाती धरोनी कृष्णराणा। बैसविता सांब गेला निघोन।।४०।। अष्टनायिका सोडोनी। वरकड ज्या कृष्णाच्या कामिनी। त्या सांबाचे लावण्य पाहोनी। झाल्या मनी विचलित।।४१।। नारद वदे तुझा सांब कुमार। असे तो रुपाने अतिसुंदर। त्यास पाहता मोहे समग्र। पाहा तव स्त्रिया द्रवल्या।।४२।। कृष्ण म्हणे मग सांबासी। तू माझ्या अन्य स्त्रियांसी। माता जांबवतीसम न पाहसी। असशी तू परम दुष्ट।।४३।। या स्त्रिया तुझे लावण्य पाहून। गेल्या बघ त्या मोहून। मी माझ्या अंतःपुरी असोन। तेथे ही तू आलासी।।४४।। होवो कुष्ट तुझे शरीरी। ऐसा स्वपुत्रासी तो शाप देई। वदे सांब भयभीत होवोनी। मज पामरा रक्षावे तुम्ही।।४५।। ऐशा या दुर्धर व्याधी पासोन। करावे तुम्हीच माझे रक्षण। शापशांती जेणे करून। होईल ऐसा सांगा उपाय।।४६।। मग कृष्णें विचार करून। पुत्र निरपराधी जाणून। जेणे होय शापनिवारण। ऐसे क्षेत्र सांगे त्याला।।४७।। म्हणे तू जाई वाराणशीस। तेथे करी सूर्य आराधनेस। तेणे पावशील तू स्वरुपास। सत्य असे हे माझे वचन।।४८।। मग सांब काशीस गेला। सूर्याराधने स्वरुपा पावला। कृष्ण उद्युक्त स्त्रियांस शापिण्या। नमून नारद निवारी त्याला।।४९।। स्वतः सर्वज्ञ, पापनाशक कृष्ण। परि गर्गादि विप्र आणोन। लोकशिक्षार्थ त्यांसी करी प्रश्न। स्वस्त्रियांचे पाप जाण्याला।।५०।। मुनि हो, या स्त्रियांनी केले पाप। कोणते सांगतो करा श्रवण। जी स्त्री मनोवाक्काये करून। स्वपुत्रावर जी होते मोहीत।।५१।। ती स्त्री करी महापापास। पाडी नरकी स्वकुळे एकवीस। यांनी इच्छिले सांब स्वपुत्रास। यास्तव या महापापिणी असती।।५२।। दुजे पवित्र नसे द्विजासमान। पवित्र करी त्यांचे वचन। मम हस्ते ही

घडली पापे अनेक। यास्तव पापनाशार्थ तीर्थ सांगा।।५३।। कृष्णा, ज्या वेदांमुळे विप्र वंद्य होती। ते वेद तुझ्या श्वासापासून होती। तरीही करीशी तू विप्रस्तुती। लोकांचे मार्गदर्शन करण्यास्तव।।५४।। तुझ्या स्मरणेमात्र पापें जाती। त्या तुला पापलेशही नसती। हे असूनही पाप निष्कृती। विचारिशी तू लोकहितार्थ।।५५।। हे तीर्थप्रदा जेथे तव स्थिती। तेच तीर्थ करणें जी वसती। जेणे जाई पाप त्या तुजप्रती। कोणते तीर्थ सांगावे।।५६।। ऐसा तू आम्हा तीर्थ पूसशी। तेंव्हा तूच सांग म्हणावे ऐशी। तुझी बुद्धी न कळे आम्हासी। सर्वज्ञा, तूच तीर्थ सांग।।५७।। मुनींचे ऐसे वचन ऐकोन। मुनींसी सादर प्रणाम करून। मुनींची आज्ञा घेवोन। करवीराचे माहात्म्य कथन करी।।५८।। मुनि हो, कोट्यावधी तीर्थे। असती भूवरी परि त्याते। करवीराच्या सोळाव्या कलेने। पावण्याची योग्यता नसे।।५९।। सर्वक्षेत्रात श्रेष्ठ हे वैष्णवक्षेत्र। जाणोन एकवीस सहस्र संवत्सर। येथे राहोन तपे दामोदर। म्हणोन असे पुण्यदायक।।६०।। तपासाठी पाहावे शुद्ध चक्र। म्हणोनी श्रीविष्णु टाकी चक्र। तेणे होतसे ते करवीर। चक्राकार मुनीश्वर हो।।६१।। जेथे चक्र पडे त्या स्थळी। तेथे होय चक्रतीर्थ त्या काळी। मग श्रीविष्णुने वसती केली। आपुल्यारुपे तेथे हो।।६२।। जेथे पंचगंगाही वसे। मणिकर्णिकाही जेथे असे। साक्षात रुद्रपदही राहतसे। तेथे मुक्ती निःसंशये।।६३।। त्या क्षेत्रास भूमीसंबंध नसे। कारण ते श्रीचे करावर वसें। जसा नभीं ज्योतिर्गण दिसे। तसे हे ज्योतिर्मय दिसे नाभी।।६४।। कृतयुगी हरिद्वाराशी। त्रेतायुगी बदरिकाश्रमाशी। द्वापारी कुरुक्षेत्री काशी। चारही युगी करवीर श्रेष्ठ।।६५।। कलियुगी तर हेच पावन। विशेष काय बहु बोलून। नरास तारक करवीराहून। अन्य क्षेत्र नसे कलियुगी।।६६।। कल्पकल्पी समुद्री पृथ्वी बुडे। परि ज्या क्षेत्राचे बुडणे न

घडे। कारण हे क्षेत्र कल्पांती पहुडे। श्रीलक्ष्मीच्या दक्षिण करी।।६७।। जे होवोनी चक्राकार। शोभवी श्रीलक्ष्मीचा कर। शिवमायांकित ते करवीर। मला रक्षो ते सर्वदा।।६८।। या रुद्रपदयुक्त तीर्थावाचून। द्वादशाब्दादि प्रायश्चिते करून। मम स्त्रियांचा न जाय पापगण। अन्यतीर्थी म्हणून हे तीर्थ थोर।।६९।। अल्प जाणोन सांबाच्या पापास। काशीस जावे वदलो त्यास। परि या स्त्रियांचे जाण्यास। करवीर हे महाक्षेत्र सांगितले।।७०।। जी योगयुक्ताते होय गती। त्यांसी होय जे करवीरा जाती। अनेक जन्मींची पापे कापती। करवीरास जाणाऱ्यांची।।७१।। या कारणें करवीर क्षेत्र। सर्व तीर्थांमध्ये असे श्रेष्ठ। याहून श्रेष्ठ नसे अन्यतीर्थ। ऐसे असे माझे मत मुनि हो।।७२।। करवीरी सारे तोय गंगाजळ। शिळा त्या लिंगेच केवळ। सर्व मनुष्यें मुनिकुळ। सकळ वृक्ष कल्पवृक्षची।।७३।। करवीरी स्वच्छंद क्रीडाची यज्ञ। स्वेच्छा भोजनची देवार्चन। निद्राच समाधी होय पूर्ण। भाषण असे तपासमान।।७४।। जेथे षडूर्मि षड्वैऱ्याशी। पंचनदी स्वजळे नाशी। सत्यादि सहा मित्र कुटुंबाशी। षट् संगमांनी वाढवी।।७५।। पूर्व वाहिनी पंचनदी द्रुहिण (ब्रह्मदेव)। तीच उत्तरवाहिनी नारायण। तीच दक्षिणवाहिनी ईशान। पश्चिमवाहिनी त्रिमूर्तिरूप।।७६।। चिदंबराच्या दर्शने करून। कमलालयात जन्मोन। काशीत मरण पावोन। अरुणचल स्मरणें मुक्ती होय।।७७।। कुरुक्षेत्री सुवर्णदानें। केदारी रेतोदक पानें। करवीरी यांतील एकानें। मुक्ती होतसे मुनि हो।।७८।। जे सर्वतीर्थी सुरू करून। जयंती मयूरीस मध्ये घालून। सर्व तीर्थापर्यंत करती प्रदक्षिण। ते षडंगयोग पावती।।७९।। जे चक्ररूप पूर्वी करवीर। तें जयंती मयुरीने नंतर। प्रदक्षिणावर्त सुखाकर। केले असे मुनि हो।।८०।। जी अकल्प क्षेत्राते रक्षिती। सर्व कार्याच्या पृष्ठीजाती। यासाठी जिला अनुगामिनी

म्हणती। ती शक्ती करवीरी असे।।८१।। संजीवनीजल कमंडलूत आणोन। उठवी शुक्र मृत दैत्यगण। अनुगामिने श्रृंगऋषी आश्रमाजवळ। अनुगामिनीने जल पाडिले।।८२।। ती नदी नाम संजीवनी। उत्तरेश्वर आणि अनुगामिनी। दोघांच्या मधून उत्तरेस जाय ती। करी सर्वांच्या पीडेचा नाश।।८३।। जर पंचगंगेचे जळ। पावें संजीवनीचे मूळ। तर तेथे स्नाने येतसे फळ। दशसहस्र गंगास्नानांचे।।८४।। भोगावती पंचनदी मंदाकिनी। आणि सुनीरा स्वर्गतरंगिणी। पयोवहा, पापहरा, पयोष्णी। असती ही अष्ट नावें पंचगंगेची।।८५।। अनुगामिनी ही आदिशक्ती। प्रतिकल्पी वधोनी दैत्याप्रती। करवीरी पाठी राहती। म्हणोनी अनुगामिनी हे नाम असे।।८६।। कृष्ण म्हणे मी पाहिले विचार करोन। करवीर वाटे अधिक सर्वाहून। आणखी क्षेत्र किंवा तीर्थ याहून। अधिक असेल तर सांगावे।।८७।। मग श्रीकृष्णास मुनी वदती। तुझेच आज्ञे वदतो आम्ही। त्र्यैलोक्यांतील सर्वतीर्थ पंक्ती। या करवीरासमान नसती।।८८।। चक्राने शोधित पंचयोजन। चक्राने रक्षित क्षेत्रे होवोन। विष्णुक्षेत्र हे नाम पावोन। विष्णु प्रकटोन दे लक्ष्मीसी।।८९।। मग विष्णुची शक्ती कमला। पाहून क्षेत्ररूपें विष्णु स्थिर झाला। आपणही होवोनी अचंचला। करवीरी राहून आनंद देतेसे।।९०।। त्या क्षेत्रीं ब्रह्मतप करोन। करी पंचमहाभूत गण। ऐसे देवी हे दुर्लभ स्नान। ते आपण पावला।।९१।। जेंव्हा नव्हती पंचमहाभूतें। तेंव्हा विष्णू निर्मी या क्षेत्रातें। हे क्षेत्राचे रहस्य कोणाते। नसे ठावे रे कृष्णा।।९२।। त्यांत ब्रह्मज्योतिप्रकाश निरंतर। म्हणून दक्षिणकाशी हे क्षेत्र। तीर्थांमध्येही श्रेष्ठ तीर्थ। मुक्तिक्षेत्रही ते असे।।९३।। पापी, अज्ञही जो जन। असे जो श्रद्धाविहीन। तो ही करवीरासी येवोन। पावतो मोक्षाते श्रीकृष्णा।।९४।। अगस्ती म्हणे मुनिवचन ऐकोन। पूर्णमनोरथ काम होय श्रीकृष्ण। मग

करवीरास निघावे म्हणोन। वाजवी नगारा स्वनगरी।।९५।। षोडशसहस्र, अष्ट नायिका। सर्व यादव गोपगोपिका। घेऊनी मुनिगण, इतरही लोका। द्वारका सोडोनी निघे हरि।।९६।। श्रीकृष्ण करवीरक्षेत्र पाहून। वाजवी वेणू अति आनंदून। शक्रादि देव विमानी बैसोन। आनंदे पाहती कृष्णयुक्त करवीर।।९७।। लक्ष्मी विश्वेश्वर रंक भैरव। तयाते नमोनी मग माधव। जयंती गोमती संगमी जे गाव। द्वारका नाम तेथे राहे।।९८।। अन्यदिनी स्त्रीसह शुचिर्भूत हरि। मुनिकथित तीर्थविधी करी। तेणे स्वस्त्रिया निष्पाप झाल्यावरी। बहुत दान कृष्ण देतसे।।९९।। जाई मग सर्वांसह गोकुळेश्वरी। म्हणे करवीराच्या एकदेशी। ऐसी बहुतही लिंगे वसती। तेणे करवीर अतिश्रेष्ठ सत्य ही।।१००।।

**श्री महालक्ष्मी चरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।**

नववा अध्याय

# ।। श्रीमहालक्ष्मी अध्याय।।

**श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।**
**श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री महालक्ष्मी नमः। श्री ग्रामदेवताय नमः।**

विघ्नहर्त्या हे गजानना। दिलीस मती तू लक्ष्मणसिंधुसुता। हरून सर्व संकट विघ्नांना। करविशी पूर्ण ही नवशती।।१।। माते सरस्वती शारदे। तव कृपाहस्त मस्तकी असे। सार्थ हो ती शब्द तेणे। साकारे तेणे करवीर लक्ष्मी माहात्म्य।।२।। माझे सद्‌गुरु समर्थ स्वामी। तयांच्या कृपे मी करी विनवणी। भुक्तीमुक्ती दात्री महालक्ष्मी। प्रसन्नास्तु मजवरी सर्वदा।।३।। करती निवास जेथे श्रीकृष्ण। ऐसे पवित्र हे करवीरक्षेत्र। करितसे पापनाशन हे क्षेत्र। म्हणूनी तीर्थात श्रेष्ठ करवीर।।४।। अगस्ती लोपामुद्रेसी वदती। नानाक्षेत्रांचा महिमा सांगती। ऐकोनी प्रसन्न होय सती। करिती ते तीर्थायात्रा विधीयुक्त।।५।। नानातीर्थे करीत महिमा सांगत। गेला अगस्ती रत्नागिरीस। केदारतीर्थी नाहून करी पूजन। केदार ज्योतिर्लिंगाचे।।६।। पूजून चर्पटांबेल रवळेश्वराला। कर्पूरवापी नाहून पूजी कर्पुरगौराला। जमदग्नीतीर्थी नाहूनी पूजी जमदग्नीशाल। रामतीर्थी नाहून रामेश्वर अन् एकवीरेस पूजी।।७।। पुढे जावोनी पूजितसे सिद्धेश्वरास। पुढे पूजी कल्लेश अन् नागेशास। मग करितसे तो संकल्पास। चतुष्क कल्लेश यात्रेच्या।।८।। क्षेत्री येऊन नमोनी श्री ते। पूर्वेस निघे पाहे तेथे। जी क्षेत्ररक्षणार्थ घेऊन चक्राते। जेथे शेषावर

निजे विष्णू।।९।। पूर्वाब्धिमध्ये होऊन सुस्नात। करितसे जलशायी पूजन। तेथेची समीप कोडोलीस। करी कल्लेश्वराचे पूजन।।१०।। मग पुनः येऊन करवीरास। श्रीस नमोनी जाई दक्षिणेस। तेथे दक्षिणाब्धी म्हणजे न्यग्राध। तीर्थात मंगलस्नान करी।।११।। नंतर जलशायीस पूजून। कल्लेश्वर पूजून येई करवीरास। तेथे श्री ते करोनी नमन। जाई पश्चिम दिशेसी।।१२।। न्यग्रोथतीर्था क्षेत्ररक्षणार्थ। पूर्ववत जलशायी असे ज्यात। पश्चिमाब्धि नामे प्रख्यात। त्या पालाशक तीर्थी करी स्नान।।१३।। तेथे पूजून जलशायीशी। त्याचे पूर्वेस एक कोशी। कल्लेश्वराते पूजून तो ऋषी। श्री ते नमोन उत्तरेस निघे।।१४।। क्षेत्र रक्षणकार्यार्थ। पूर्ववत जलशायी असे ज्यांत। त्या उत्तराब्धिनाम अश्वत्थतीर्थात। नाहून जलशायीस पूजी।।१५।। त्याच्या दक्षिणेस क्रोश युगीं। कल्लेशाते पूजी तो योगी। पुनः येऊन करवीरा लागी। महालक्ष्मी नमिली त्याने।।१६।। नारद सांगे मार्कण्डेयाला। ऐसी यात्रा करावयाला। स्त्रीयुक्त त्या मुनिवर्याला। पाच मास लागले रे।।१७।। नारद म्हणे, मग श्री ते नमोन। निघे महाद्वार चतुष्क यात्रेस। पूर्वेस पर्वती रामेश्वर पूजोन। पुनः स्त्रीसह येऊनी श्रीस नमी।।१८।। दक्षिणेस पूजून चक्रेश्वर। पुनः येऊन करी श्रीस नमस्कार। मग पश्चिमेस जावोन सत्त्वर। स्त्रीयुक्त तो कल्लेशापूजी।।१९।। क्षेत्री येऊन श्री ते नमोन। मग उत्तर दिशेस जावोन। तेथे गुप्तमल्लिकार्जुना पूजोन। क्षेत्री येऊन श्री ते नमी।।२०।। द्वारयात्रा फल यावें म्हणोन। ब्राह्मणास घाली भोजन। तांबुल दक्षिणा देवोन। स्त्रीसह आपण करी भोजन।।२१।। प्रातःकाली स्त्रीस बोले वचन। आम्ही महालिंगाष्टक दर्शन। केले पाहिजे ऐसे वदोन। मणिकर्णिकेत स्नान करी।।२२।। मग लक्ष्मीपासी जावोन। महालिंगाष्टक यात्रा संकल्पून। श्रीस करोनी साष्टांग

नमन। त्या यात्रेस निघे अगस्ती।।२३।। असे पूर्वेस कृष्णातीरी। जो अमरेश त्याची पूजा करी। स्त्रीसह येवोनी श्रीस नमस्कारी। मग आग्नेयेस खिदरापुरा जाय।।२४।। तेथे कृष्णेत स्नान करून। पितरां तर्पोन कृष्णेस नमोन। कोपेश्वर लिंगाते पूजून। पुनः येऊन श्री ते नमी।।२५।। दक्षिणेकडे येडूरास जाऊन। तेथे कृष्णेत स्नान करून। वीरभद्राचे करून पूजन। पुनः येऊन श्री ते नमी।।२६।। नैऋत्येत संकेश्वरपुरी। नवनीता नदीत स्नान करी। सिद्ध सांख्येश्वरा पूजून ये क्षेत्री। श्री ते नमोनी पश्चिमेस जाई।।२७।। भोगावी भोगेश्वराची पूजा करी। पश्चिमेस असे नदी कासारी। तीस भद्रा म्हणती तिच्या माझारी। नाहून पुनः भोगेश्वरा पूजी।।२८।। पुनः येऊनी श्रीसी नमून। मग वायव्येस वाटगावा जावोन। वाटेश्वराचे करून पूजन। पुनः येऊन श्रीते नमी।।२९।। उत्तरेस कृष्णेत असती चार। रामेश, लक्ष्मणेश, सीता, वायुकुमार। त्या सर्वांते पूजून मुनिवर। क्षेत्री येऊन श्रीते नमी ।।३०।। ईशान्येस कृष्णावरुणासंगमी। जाऊन तर्पण करितसे मुनी। पुष्पादि वाहून संगमेश लिंगी। क्षेत्री येऊन श्रीते नमी।।३१।। मग हर्षे गेला स्वस्थानाला। लिंगाष्टक फळ यावयाला। विप्रांते जेववून तयाला। विडे दक्षिणाही देतसे।।३२।। मग तो स्त्रीसह जेवून। सायंकाळी संध्या करून। श्रीची आरतीही पाहून। स्वस्थानी गेला मार्कण्डेया।।३३।। नारद म्हणे तो अगस्तीमुनी। नित्य प्रातःकाळी उठोनी। महालक्ष्मीस नमी सपत्नी। ऐसे कितीतरी दिवस करी।।३४।। ऐसे वर्तता एके दिवशी। शुक्रवारी तो तपोराशी। पंचामृते श्रीसूक्तेही श्रीसी। अभिषेक करी मार्कण्डेया।।३५।। यथाविधी पूजोन अगस्ती। पूर्वोक्त प्रकारे करी स्तुती। करवीरी राहाया अनुमती। मागे श्रीसी मार्कण्डेया।।३६।। लक्ष्मी म्हणे अगस्तीसी। तुज पूर्वी आज्ञा केली ऐसी। जा रे तू स्कंदापासी। पुन्हा

पुन्हा काय सांगावे तुज।।३७।। तुझी करुणा असे मजला। म्हणून सहा महिने अवधी दिला। आता त्यावरही एकपक्ष झाला। करवीरी तीर्थलिंगे असती अनेक।।३८।। त्यांतील श्रेष्ठ तीर्थ देवांस। तू सहा महिन्यांत पाहिलेस। म्हणोनी सर्वयात्रा केलीस। यात संशय नसे सर्वथा।।३९।। जावे आत स्कंदापाशी। काशीद्वय माहात्म्य तो कथेल तुजसी। ऐकोनी तू निश्चित पावसी। काशीद्वयवासाचे फळाला।।४०।। नारद म्हणे हे ऐकोनी। करवीरातून निघाला मुनी। आपणास कृतकृत्य मानोनी। श्रीस नमोनी प्रदक्षिणा करी।।४१।। मग निघे दक्षिण दिशेला। लक्ष्मीसी स्मरत पुढे गेला। श्रीशैली नमी मल्लिकार्जुनाला। जाई तेथोनी पाताळगंगेला।।४२।। तेथील यात्रा पूर्ण करून। आला विरुपाक्ष दर्शनास। विरुपाक्षाते नमून पूजून। झाला कृतकृत अगस्ती मुनी।।४३।। कृत्तिका योगी कार्तिक पौर्णिमेस। गेला अगस्ती कार्तिकस्वामी दर्शनास। मग म्हणे तो कार्तिकस्वामीस। महालक्ष्मीने धाडीले तुजप्रत।।४४।। ती म्हणे काशीद्वय महिमान। करी स्कंदापासून श्रवण। तेणे मम वाक्ये येईल जाण। काशीद्वय वास फळ तुज।।४५।। यास्तव दोन्ही क्षेत्रांचे महिमान। ऐकण्यासाठी आलो जाण। करी रे तू मजला कथन। ऐकोनी स्कंद वदे त्यासी।।४६।। शिव एकवीस कल्पांचे उमेला। माहात्म्य या क्षेत्रद्वयाचे वदला। ते उभा मज सांगे परि मला। विसरलो मी मंदबुद्धी।।४७।। सात कल्पांचे मात्र मी धरीले। म्या ते सनत्कुमारा कथिले। त्याने नारदा, नारदे धर्मास कथिले। असे थोर परि संक्षेपे सांगतो।।४८।। अगस्ती म्हणे महिमा करवीराचा। आधी वद नंतर काशीचा। ते ऐकोनी स्कंद वदे वाचा। ऐक ऐक रे अगस्ती मुने।।४९।। नारदाने जो धर्मराजा कथिला। स्कंदाने अगस्तीस सांगितला। ऐकोनी महिमा दक्षिणकाशीचा। पावला निवासफळ

एकवीरा परम। कालरात्री दुरत्यया।।६५।। ही दहा तुझी नामें जाण। कर्मे करुनी प्रतिपाद्य पूर्ण। या तुझ्या नामकर्मातें जाणून। पठण करी तो सुख पावेल।।६६।। यापरि बोलून कालीप्रत। महालक्ष्मी काय करीत। महासरस्वती रुप त्वरित। घेऊन तिसरी जाहली।।६७।। अतिशुद्ध सत्त्वगुणें करून। महासरस्वती जाहली जाण। चंद्रासारिखी प्रभा पूर्ण। धारण करिती जाहली।।६८।। अक्षमाला, अंकुशधारी। वीणा, पुस्तक घेऊनी करी। होती जाहली ती श्रेष्ठ नारी। नामे ऐका तियेची।।६९।। महाविद्या, कामधेनु, भारती। आर्या, ब्राह्मी, वाक्, सरस्वती। महावाणी, वेदगर्भा निश्चिती। श्रीधरी हे दहावे।।७०।। यानंतर महालक्ष्मी आपण। बोलती जाहली दोघी लागून। तुम्ही उभयताही जाण। कन्या आणि पुत्र निर्मावे।।७१।। त्या दोघीते ऐसे बोलून। स्वयें महालक्ष्मी आपण। कन्या पुत्राते आपणापासून। निर्मिती जाहली तात्काळ।।७२।। पुत्र तो ब्रह्मदेव जाण। कन्या ती लक्ष्मी सगुण। त्या दोघांतें नामाभिधान। ठेविती जाहली जगदंबा।।७३।। विधी, हिरण्यगर्भ, विरिंची, धाता। ऐसी पुत्राची नावें ठेवी माता। श्री पद्मा, कमला, लक्ष्मी, तत्त्वता। कन्येची नावे ठेविली।।७४।। त्यानंतर महाकाली आपण। कन्यापुत्राते आपणापासून। उत्पन्न करिती जाहली जाण। मनेंकरून क्षणमात्रें ।।७५।। पुत्र तो महादेव देव। कन्या ती सरस्वती सम्यक्। त्या दोघांते नामे अनेक। ठेविती जाहली महामाया।।७६।। श्रीकंठ रक्तबाहु शंकर। श्वेतांग, कपर्दी चंद्रशेखर। त्रिलोचन, रुद्र, स्थाणु ईश्वर। नामे ठेविली पुत्राची।।७७।। सरस्वती, त्रयीविद्या, स्वरा। कामधेनु आणि भाषाक्षरा। नामें ठेवी ती सुंदरा। कन्ये लागी तये वेळी।।७८।। त्यानंतर महासरस्वती। कन्यापुत्राते जाहली निर्मिती। पुत्र तो महाविष्णु निश्चिती। कन्या गौरी परियेसा।।७९।। विष्णु, कृष्ण, हृषिकेश। वासुदेव जगन्निवास। जनार्दन

मुनी अगस्ती।।५०।। हे महालक्ष्मी सृष्टीचा दुर्गम। चालविसी तूची अनुक्रम। त्या तुजसी माझे प्रणाम। माते तव चरणी नत मी।।५१।। तुझे नामस्मरण करिता चित्ती। होई सर्व विघ्नांची शांती। सर्व इष्ट कामना पुरती। नमन माझे तव चरणी।।५२।। सकळांच्या आदीची जाण। असे ही महालक्ष्मी आपण। सर्व जगाची ईश्वरी पूर्ण। विष्णुस्वरुपा आहे ती।।५३।। त्रिगुणस्वरूपे जीस वर्णिली। परि असे ती मुख्य सात्त्विकी। देवतास्वरुपें उत्पन्न जाहली। असती लक्षानुलक्षे रुपे तिची।।५४।। भक्तांसी स्वरूप असे लक्ष्य। परि अभक्तांसी अलक्ष्य। सर्वजग व्यापून सर्व साक्ष। स्वरूप असे राहिले तें।।५५।। मातुलिंग गदा खेट। पानपात्रधारी स्पष्ट। नागलिंग योनी वरीष्ठ। धरती जाहली ती मस्तकी।।५६।। तप्त सुवर्णासम सुंदर वर्ण। सुवर्णाची सुंदर भूषणें जाण। सकळ लोक शून्य पाहून। आपुल्या तेजे केला पूर्ण।।५७।। शून्य पाहूनी सकल लोक। धरीले तिने दुजे स्वरूप। ही केवळ तमोगुण सकळीक। कृष्णवर्णा जाहली ती।।५८।। तीच ती असे महाकाली। असे तियेचा कृष्णवर्ण। विक्राळ दाढायुक्त वदन। लोचन विशाल तियेचे।।५९।। तनुचे ठायी मध्यम आपण। दिसे नारी शोभायमान। कबंध हारातें उरे करून। धारण करती जाहली।।६०।। शिरांची माळा घातली जाण। एके हस्ती खड्ग घेऊन। दुजे हस्ती पानपात्र धारण। करिती जाहली जगदंबा।।६१।। तिसरे हस्ती धरीले शिर। चौथे हस्ती खेटक सुंदर। अलंकृत चतुर्भुज समग्र। शोभेतसे महाकाली।।६२।। ती प्रमदोत्तमा काली तामसी। बोलती झाली महालक्ष्मीसी। नामकर्म देई गे मजसी। माते तुजला माझे नमन।।६३।। महाकालीचे ऐकोनी वचन। मग महालक्ष्मी बोले आपण। नामकर्माते तुज लागुन। देते आता श्रवण करी।।६४।। महामाया, महाकाली उत्तम। महामारी, क्षुधा, तृषा हे नाम। निद्रा, तृष्णा,

ही नामें विशेष। पुत्रालागी ठेविली।।८०।। उमा, सती, चंडी, गौरी। शुभगा, शिवा आणि सुंदरी। ही कन्येची नामे सत्त्वरी। ठेविती जाहली तेधवा।।८१।। याप्रकारे युवती जाण। पुरुषत्व पावल्या आपण। ज्ञाते पाहती तयांचे ज्ञान। ज्ञान नयन असे जयांसी।।८२।। महामायेच्या स्वरुपातें। ज्ञानें जाणती ते जाणते। इतर ज्ञानी नेणते। न जाणती ते कदाही।।८३।। नंतर महालक्ष्मी जी तिणें। सरस्वती दिधली ब्रह्मदेवाकारणें। विष्णुही तियेची आज्ञेनें। लक्ष्मीते वरिता जाहला।।८४।। भ्रतार गौरीचा आपण। महादेव जाहला जाण। ऐसे महालक्ष्मीच्या आज्ञेवरून। तिघेही जाहले कुटुंबी।।८५।। उत्पत्ति-स्थिती-प्रलयास। सामर्थ्य दिधले तयांस। ब्रह्मा घेऊनी सरस्वतीस। यथासुखे राहिला।।८६।। सरस्वतीसह वर्तमान। एकत्र होऊनी चतुरानन। ब्रह्मांडाते करुनी उत्पन्न। चराचराते निर्मितसे।।८७।। ब्रह्मांडासहीत जे जे सर्व। त्या त्या संहारी महादेव। गौरीसहीत होऊनी अपूर्व। प्रलय करिता जाहला।।८८।। ब्रह्मांडासहीत जे जे निर्माण। स्थावर जंगमादि असे जाण। त्यातें त्यातें नारायण। पालन करी लक्ष्मीसह।।८९।। सर्व सत्वमयी आपण। महालक्ष्मी असे जाण। सकळांची ईश्वरीपूर्ण। महामाया जगदंबा।।९०।। तीच मूळ प्रकृती साचार। असती जाहली निराकार। पुढे होती जाहली साकार। तीच गुणमयी प्रकृती।।९१।। जे जे दृश्यमान पाहावें। आणि श्रोते हो श्रवण करावें। जे जे मानसी कल्पावें। मायारुपची सकलही।।९२।। महालक्ष्मीचे आराधन। प्रेम भक्तिभावे करावे पूजन। महालक्ष्मी तीच महाकाली जाण। तिची ही महासरस्वती।।९३।। मूळमाया एकची साचार। तिचेची हे तीनही अवतार। कार्यार्थी तिने घेतले समग्र। नसे संशय सर्वथा।।९४।। जो महालक्ष्मीची पूजा करी। तो या जगाचा प्रभु निर्धारी। त्या कारणास्तव पूजा करावी। चंडिकेची

सर्वदा।।९५।। देवी तूची सकल जगाची माता। चराचरी वागे तव सत्ता। विश्वाची ईश्वरी तू तत्त्वता। आम्हालागी हो प्रसन्न।।९६।। तू वैष्णवी शक्ती उत्तम। अनंत तुझा पराक्रम। या जगाचे बीज परम। थोर माया असशी तू।।९७।। तू उत्पत्ति - स्थिती - प्रलयाची। शक्ती अनादि असशी साची। गुणाश्रया गुणमयाची। नारायणी नमोऽस्तु ते।।९८।। हे महालक्ष्मी, महाकालि। शक्तिमती तू ची महासरस्वती। तवकृपे साकारली नवशती। परमात्मस्वरूप स्वामी प्रसादे।।९९।। स्वामी समर्था अनाथनाथा। तव चरणी ठेवितो माथा। असो ऐसीच तुमची कृपा। धन्य धन्य असे भक्त गणेश।।१००।।

**श्री महालक्ष्मी चरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।**

।।श्री।।

## ।। श्री स्वामी समर्थ स्फुरित श्री जगदंबा मंत्र ।।

जय अंबा जय अंबा जय अंबा। स्वामी बोले बोलके जय अंबा डोले।।
अंबा माता बोले। बोलके सारे भगत मन ही मन खोले।।
अंबा माई तु ही गुण ज्ञानी। सारे भक्तों के संकट को मन से ही जानी।।
सिर पे साडे तीन कुंडल नाग के सवारे। बन के शक्ती सारे प्राणियोंका जीवन सुधारे।।
दूर भगावे दारिद्र्य को। ऋण तो समीप न आवे।।
जय जगदंबे तेरी आहट से। खाली भांडार भर जावे।।
छम छम बजाके सुख। तेरे पाछु आवे।।
खोलकर भाग्य का ताला। समृद्धी हाथ पाव पसारे।।
माये जगदंबे तू ही करवीर भोगिनी।।
करवीर वासिनी सोचे। करवीर वासिनी नाचे।।
करवीर वासिनी बोले। करवीर वासिनी डोले।।
श्रीरामचंद्र गुण गावे। गाकर माँ को झुलावे।।
झुलाकर वर देवे। माँ तू ही मन मंदिर में समावे।।

श्री परशुराम भुमिको सजावे। माँ के मंडप की रक्षा करावे।।
वर्षा धूप में छाया धरावे। बलशाली होने का वर दिलावे।।
गोपालोंका नायक श्रीकृष्ण तुम्हारे भजन करावे।।
भजन से ही जगदंबा वर देवे। सुखे अकाल में भी अमृत फल दिलावे।।
जय हो जगदंबा, जय हो जगदंबा, जय हो जगदंबा।।
सारे जगत की तुम ही हो अंबा।।
शेष पर बैठी विष्णु के पाव दबाती। मोहक वाणी करके विष्णु से प्यार सजाती।।
कनक की ढाल लेती, हिरों की तलवार भाती। सहस्रार सुदर्शन चक्र हाथ में सवारती।।
शंख फुंक के शत्रु को मूरछित करती। गदा अभिघातेन शत्रु पीडयती।।
हाय हाय करके शत्रु। माँ बचाओ बोतली, माँ माफ करो बोलती।।
भगत को सुखी करती। पद्म धारण करके, सांज को घर आती।।
धन धान्य हिरे पाचु माणिक मोती। सदाही सुख समृद्धीका वर्षाव करती।।
गृह से दुःख दारिद्र्य ऋण को दूर भगाती।।
हे अंबे तू ही माय। भगत को सिने से लगाय।।
प्रेम की वर्षा करके। दिन भगत को झुलाये।।
ॐ अंबा अंबा अंबा अंबा अंबा अंबा अंबा अंबा अंबा।।

पद्म धारिणी, दुःख हारिणी, जगद पालिनी, दारिद्र्य नाशिनी।।
सुख झुलाविनी, समृद्धी दायिनी, परम संतोष कारिणी, शत्रुबुद्धी स्तंभीनी।।
शत्रु वशिकारिणी, महाशत्रु उच्चाटिनी, विद्वेशिनी, मारिनी, परमौच्चस्थान दायिनी।।
सुप्रसिद्धी दर्शिनी, प्रदायीनी ॐ श्रीम् पद्मावत्यै नमो नमः।।
झुल झुल झुलावे आनंद में झुलावे।।
जैसे मोर नाचे बन में वर्षा की आहट दिलावे।।
वैसे माँ तू ही डोलके धन भांडार खुलावे।।
आठ दिशासे माँ आठ द्वार खोले।।
आदि लक्ष्मी, धैर्य लक्ष्मी, धान्य लक्ष्मी, विजया लक्ष्मी।।
विद्या लक्ष्मी, संतती लक्ष्मी, धन लक्ष्मी, गज लक्ष्मी।।
हे जगदंबा संतप करो दूर कराके अलक्ष्मी।।
टक टक करती दरवाजे को। समद्धी से भरती गृह को।।
सदा वास करके भक्त के नसीब में। यही मन्नत मेरी जानलो जीवन में।।
ॐ श्रीं ऱ्हीं जगदंबा महालक्ष्मी नमो नमः।।
हरि ॐ तत्सत।

।।श्री।।

# ।। श्री आवाहनम्।।

अस्माकं अम्बा त्वं एहि, हे अम्ब जबदम्ब पाहि।
भाग्यलक्ष्मी एहि, सौभाग्यलक्ष्मी पाहि।।
वरदे, शुभदे, भक्तशरण्ये, स्मितोल्हासिनि एही।
सर्व मङ्गले, महन्मङ्गले, करुणापाङ्गे एहि।।१।।
पापविनाशिनी, भवसुखदायिनी, विष्णुविलासिनी एहि।
सागरकन्ये, त्रिभुवधन्ये, पतितोद्धारिणि एहि।।२।।
झिङ्कृत नुपूर नाटक नाटित नटनायकनटि एहि।
मधुमुरलीरवमुग्ध मनोहरे, जगन्मोहिनि एहि।।३।।
अलकानन्दे, परमानन्दे, कातरवन्दे एहि।
सुरवरपूजिते, रामवनिते, सन्ध्यासमये एहि।।४।।
तनयवत्सले, भक्तवत्सले, अर्चन समये एहि।
श्रीनिवास प्रिये देवी भक्तनिवासं एहि।।५।।